# दैनंदिनी

दैनंदिनी

Cover - 2

# दैनंदिनी

दैनंदिनी

**दैनंदिनी**

प्रकाशक :
**सेहत (सेंटर फॉर इनक्वायरी इनटू हेल्थ अ‍ॅन्ड अलाईड थीम्स)**
सर्व्हे नं. २८०४-२८०५,
साई आश्रय, आराम सोसायटी रोड,
वाकोला, सांताक्रूझ (पू.), मुंबई-४०० ०५५.
फोन: २६६७३१५४ ● २६६७३५७१
फॅक्स-२६६७३१५६
E-mail: cehat@vsnl.com

खालील पत्त्यावर दैनंदिनी उपलब्ध होतील:
**दिलासा**
विभाग क्र. १०१, अपघात विभागासमोर,
के.बी. भाभा रुग्णालय, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.
फोन : २६४००२२९ (डायरेक्ट)
● २६४२२७७५ ● २६४२२५४१ एक्स्टेंशन ४३७६, ४५११
E-mail: dilaasa@vsnl.net

**© CEHAT**

मुखपृष्ठ :
**प्रमिला नाईक**

मुद्रक :
**साटम उद्योग**
परेल, मुंबई-४०० ०१२.
फोन : २४१३६१७१

अक्षर जुळवणी, आतील मांडणी व सजावट :
**प्रदीप कापडेकर**
**प्रमिला नाईक**

# आभार

ह्या दैनंदिनीतील सर्व माहिती समुपदेशकांसाठी मार्गदर्शक, आरोग्यसेवकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे व यासारख्या सेहत संस्थेने प्रकाशित केलेल्या इतर साहित्यातून घेण्यात आलेली आहे. अश्विनी जोग यांनी ही माहिती एकत्र करण्यास मदत केली.

दैनंदिनी तयार करत असताना त्यात वेळोवेळी सूचना करून तसेच प्रथम आराखड्याचे परीक्षण करून दैनंदिनी अधिक उपयुक्त बनवण्यात सेहत संस्थेच्या सुजाता आयरकर, संगीता रेगे, आरती चंद्रशेखर, प्राची आवळसकर, रजिता चव्हाण, चित्रा जोशी व मृदुला सावंत ह्यांचा हातभार आहे.

विजय सावंत व अपूर्वा जोशी यांनी देशभरात संबंधित विषयावर काम करणाऱ्या संस्थांचे संपर्क उपलब्ध करून दिले आहेत. या सर्वांसोबत आम्ही सर्व ११ दिलासाच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानतो. या सर्वांनी सातत्याने हिंसापिडित महिलांना सतत साहाय्य/मदत केली आहे. तसेच यासंबंधित बैठकी करता दिलीप जाधव व शोभा कांबळे यांनी आवश्यक ती मदत पुरवली. या सगळ्यांचेच मनापासून आभार.

# प्रस्तावना

महिलांवरील हिंसा आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्था यांचा खूप जवळचा संबंध आहे याची नोंद सर्वप्रथम मुंबई महानगरपालिकेने घेतली. महिलेवर हिंसा झाल्यावर किंवा तिने आत्महत्येचा प्रयत्न केल्यावर आरोग्य समस्या उद्‌भवते. यामुळे बऱ्याचदा स्त्रीया स्वतः वैद्यकीय मदतीसाठी सार्वजनिक रुग्णालयात येतात किंवा आणल्या जातात. या तिच्या रुग्णालयातील प्रवेशापासूनच आरोग्य कर्मचाऱ्यांची संवेदनशीलता तिच्यावर होणाऱ्या अत्याचारांना वाचा फोडण्यासाठी, तिला बोलते करण्यासाठी महत्त्वाचा धागा ठरु शकते. हीच बाब लक्षात घेऊन मुंबई महानगरपालिकेचे के.बी. भाभा रुग्णालय व सेहत यांनी या महिलांसोबत काम करण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारे २००० साली भारतात, मुंबई महानगरपालिकेच्या एका सार्वजनिक रुग्णालयात सर्व प्रथम रुग्णालयस्थित आपत्कालीन समुपदेशन केंद्र सुरु झाले. या केंद्राची सुरुवात हिंसा पीडित महिलांना मनोसामाजिक काळजी, कायदेशीर समुपदेशन व आपत्कालीन परिस्थितीत तातडीने निवाऱ्याची सोय या सुविधा देण्या करता करण्यात आली. २००६ साली अशाच प्रकारचे दुसरे दिलासा विभाग कुर्ला भाभा रुग्णालयात कार्यरत झाले.

मुंबई शहरातील अशा अनेक हिंसापिडीत महिला व मुलांना कौटुंबिक तसेच लैंगिक हिंसेला प्रतिबंध व उपाय करण्यासाठी परिपूर्ण मदत व्हावी या हेतूने पुन्हा एकदा मुंबई महानगरपालिका आणि सेहत यांनी संयुक्तपणे अशा बळी गेलेल्या व्यक्तींसाठी डॉक्टरांचे प्रशिक्षण घेऊन ३ रुग्णालयात वैद्यकीय तसेच मनोसामाजिक मदतीचे काम २००८ साली सुरु झाले.

अशा प्रकारचे काम सलग काही वर्षे केल्यानंतर केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने या महत्त्वपूर्ण व उपयुक्त कामाची देखल घेत २०१६ साली राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियाना (NHM) अंतर्गत अशाच प्रकारचे ११ दिलासा नवीन केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत २०१६ साली, मुंबईतील ११ उपनगरीय रुग्णालयात दिलासा केंद्रे स्थापन करण्यात आली. प्रत्येक केंद्रात पूर्ण वेळ समुदपदेशक (२), ए.एन.एम. (२) व डेटा एन्ट्री ऑपरेटर (१) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मला हे सांगताना आनंद होतो की जवळपास २००० महिला व मुलांनी दिलासा केंद्रातील सुविधांचा लाभ घेतला आहे.

हि दैनंदिनी महिलांना मनोसामाजिक आधार पुरविणाऱ्याचे काम करणाऱ्या व्यक्तींकरता तयार करण्यात आली आहे. हि दैनंदिनी एखाद्या पडताळणी सूचीप्रमाणे असून यात हिंसाचाराचे प्रकार, हिंसेची व्यापकता, हिंसेचे परिणाम व हिंसा रोखण्यासाठी विशिष्ट प्रकारचा हस्तक्षेप या बद्दलची माहिती छोटेखानी स्वरूपात देण्यात आलेली आहे.

या दैनंदिनीने दोन उद्देश साध्य होतात, समुपदेशकांना यात नोंदी ठेवता येतात व यात असलेली माहिती पाहून हस्तक्षेप करताना काही राहून तर नाही गेले ना, हे पाहण्यासाठी याचा पडताळणी सूचीसारखाही उपयोग होतो. दैनंदिनीच्या शेवटी देशभरातील इतर संस्थांचे संपर्क देण्यात आलेले आहेत ज्याचा उपयोग गरज असल्यास पिडीत महिलेला संदर्भित करण्याकरता होईल.

समुपदेशकांना ह्या दैनंदिनीतील माहितीचा उपयोग हिंसा पिडीत महिलांना मदत करण्यासाठी नक्की होईल अशी मी आशा करते. सर्वच समुपदेशकांना त्यांच्या कामा करता खूप शुभेच्छा ... !

# दैनंदिनी बद्दल ...

हिंसापिडीत महिला व मुलांसोबत काम करणाऱ्या समुपदेशकांसाठी खास हि दैनंदिनी तयार करण्यात आली आहे. स्वतःच्या समुपदेशनाच्या कौशल्याची उजळणी करण्यासाठी तसेच महिला विरोधी हिंसेचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी समुपदेशकांना याची मदत होईल. हि दैनंदिनी एखाद्या पडताळणी सूची प्रमाणे असून रुग्णालय किंवा रुग्णालयाबाहेर कार्यक्षेत्रात काम करत असताना समुपदेशक सहजतेने दैनंदिनी वापरू शकतात. यात त्यांना केसची हाताळणी करत असताना संबंधित प्रकरणांच्या नोंदी ठेवता येतील व समुपदेशन प्रक्रियेतील एखादी गोष्ट सुटत तर नाही ना हेही तपासून पाहता येईल.

दिलासामध्ये स्त्रीवादी समुपदेशनाची पद्धत वापरली जाते. या पद्धतीत नातेसंबंधामधील असमानता व सत्ता यांना आवाहन दिले जाते. बाहेरच्या जगातील दडपशाहीला महिला म्हणून सामोरे जाताना ज्या असमानतेचा सामना करावा लागतो ते अनुभव समजून घेण्यासाठी महिलांना हि पद्धत मदत करते. केवळ व्यक्तीच्या मानसिक स्थितीवर भर देणाऱ्या व त्यासाठी कारणीभूत असलेल्या समस्यांमागील भेदभावावर आधारित समाजाची रचना व नातेसंबंध यांना नजरेआड करणाऱ्या इतर पारंपारिक समुपदेशन पद्धतीपेक्षा हि पद्धत वेगळी ठरते.

हिंसेचे विविध प्रकार, हिंसेचा आरोग्यावर परिणाम, सुरक्षा चाचणी व नियोजन याच सोबत स्त्रीवादी समुपदेश पद्धतीतील समुपदेशनातील संबंधित तत्त्वे, तंत्रे व घटक इतर अनेक महत्त्वाच्या गोष्टींची सतत उजळणी होत रहावी हाच यामागचा उद्देश आहे. यासारख्या अनेक गोष्टींचा समावेश या दैनंदिनीत करून अनेक हिंसापिडीत महिला व मुलांसोबतच्या कामाला हातभार लावण्याचा हा छोटासा प्रयत्न केलेला आहे. यातून दिलासा किंवा समविचारी काम करणाऱ्या संस्था व केंद्रात मदतीसाठी येणाऱ्या महिला व मुलांना अधिक चांगल्या प्रकारे मदत मिळेल हीच अपेक्षा.

चला तर, या दैनंदिनीचा वापर यावर्षीच्या आपल्या कामाला जोमाने सुरुवात करु. तुम्हाला तुमच्या आरोग्य विषयक कामासाठी व वैयक्तिक विकासासाठी खूप खूप शुभेच्छा ... !!

# वैयक्तिक माहिती

नाव : ____________________

घरचा पत्ता : ____________________

____________________

____________________

आरोग्य केंद्राचा पत्ता : ____________________

____________________

____________________

दूरध्वनी : कार्यालय: __________ घर: __________

विभाग कार्यालय: __________ ब्यूरो कार्यालय: __________

फॅमिली डॉक्टर: ____________________

दुर्घटना झाल्यास कोणाशी संपर्क साधावा: __________

रक्तगट: ____________________

बँक खाते क्रमांक: ____________________

इतर काही: ____________________

____________________

____________________

काही आजार असल्यास: ____________________

____________________

____________________

____________________

## स्त्री विरोधी हिंसा

स्त्री असणे या एकमेव कारणामुळे वाट्याला येणारे विविध प्रकारचे हिंसक वर्तन 'स्त्रीविरोधी हिंसा' या संज्ञेत सामावलेले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्त्रीविरोधी हिंसा निर्मुलन जाहीरनाम्यातील कलम २ नुसार 'वैयक्तिक किंवा सार्वजनिक आयुष्यातील लिंगभेदावर आधारित अशी कोणतीही हिंसा ज्यामुळे स्त्रीला शारीरिक, लैंगिक किंवा मानसिक इजा पोहोचते किंवा पोहोचण्याची शक्यता असते. तसेच अशा प्रकारच्या हिंसेच्या धमक्या, बळजबरी किंवा स्वातंत्र्याचा अवाजवी संकोच या सर्वांना 'स्त्रीविरोधी हिंसा' असे संबोधित केले जाईल.'

## हिंसेचे प्रकार व लक्षणे

**शारीरिक हिंसा :** मारहाण, जाळणे, चटके देणे, केस ओढणे, थोबाडीत/लाथ मारणे, चिमटे काढणे, चावणे, गळा दाबणे, अंगावर थुंकणे, वस्तू फेकून मारणे, उपाशी ठेवणे, आजारात उपचार व काळजी न घेऊ देणे, शस्त्राचा धाक दाखविणे, धारदार वस्तूंनी जखम करणे, लैंगिक अवयवांना इजा करणे.

**भावनिक हिंसा :** मानसिक छळ, टोमणे मारणे, शिव्या देणे, न बोलणे, घराबाहेर न जाऊ देणे, संशय घेणे, भावनांकडे लक्ष न देणे, स्त्रीचा किंवा नातेवाईकांचा अपमान करणे, नातेवाईकांशी संबंध न ठेऊ देणे, त्यांना भेटण्यासाठी बंदी घालणे, वस्तूंची नासाडी करणे, सतत सोडून देण्याची धमकी देणे, मुलांना मारण्याची किंवा पळवून नेण्याची धमकी देणे, तुम्ही वेडे आहात असे इतरांना सांगणे.

**लैंगिक हिंसा :** लैंगिक संबंध न ठेवणे, गर्भनिरोधक वापर न करू देणे, सारखे गरोदरपण लादणे, बलात्कार, अश्लील हावभाव करणे/लिहिणे/बोलणे, लैंगिक विषयावर थट्टा/मस्करी/विनोद करणे, स्त्रीला उपभोगाची वस्तू समजणे, संशय घेणे तसेच शरीरसुख नाकारणे

**आर्थिक हिंसा :** घरात खर्चाला पैसे न देणे, घराबाहेर काढणे, स्त्रीकडून बळजबरीने पैसे घेणे, माहेराहून पैसे आणावे यासाठी सतत तगादा लावणे.

**सामाजिक व राजकीय हिंसा :** जातीय व धार्मिक दंगलींमध्ये स्त्रियांवर बलात्कार, पुरुषाला धडा शिकविण्यासाठी स्त्री जोडीदारावर लैंगिक अत्याचार.

**हिंसा कोणावर होऊ शकते?**

कौटुंबिक हिंसा गरीब, असहाय्य, विशिष्ट धर्म वा समाजाच्या स्त्रियांवर होते हा समज चुकीचा आहे. उच्च व मध्यम वर्गातील स्त्रियांवर हिंसा झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. हिंसा कोणत्याही जात, धर्म, गरीब, श्रीमंत, शिक्षित, अशिक्षित, खेडे किंवा शहरातील स्त्रियांवर होऊ शकते.

**कौटुंबिक हिंसेचे मुलांवर होणारे परिणाम**

- स्त्री गरोदर असताना हिंसा झाल्यास गर्भास प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या इजा होऊ शकते. मारण्याच्या ओरडण्याच्या आवाजाने गर्भातल्या बालकाच्या कानठळ्या बसत असतात व गर्भपाताचीही शक्यता असते.
- घरातील हिंसेमुळे लहान बालकांच्या विकासावर परिणाम होतो. त्यांची वाढ खुंटते व ती किरकिरी होतात.
- अशा वातावरणात वाढलेली मुले चंचल किंवा घाबरलेली असतात. त्यांच्यामध्ये असहाय्यतेची व अपराधीपणाची भावना निर्माण होते. अशी मुले झोपेत देखील खूप घाबरलेली असतात.
- ही मुले खूप घाबरट देखील होतात किंवा त्यांना नैराश्यही येऊ शकते.
- घरातील हिंसक परिस्थिती बदलू न शकल्याने मुलांमध्ये सत्ताहीनतेची भावना निर्माण होते. यामुळे मोठी होऊन मुले सत्ता मिळविण्यासाठी दुसऱ्यांवर जोर जबरदस्ती करतात किंवा असहाय्य परिस्थितीचा स्वीकार करून सतत अन्याय सहन करीत राहतात.
- वडिलांच्या वागण्याकरिता किंवा आईला होणाऱ्या मारहाणीबद्दल स्वतःला दोषी ठरवतात.
- मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो. स्वाभिमानाची कमतरता निर्माण झाल्याचे जाणवते. अशा मुलांमध्ये बिछान्यात लघवी करणे, नापास होणे किंवा पुढे जाऊन दारू, जुगार, अनेकांबरोबर शारीरिक संबंध अशी व्यसने लागू शकतात.
- ही मुले स्वतःला इजा करून घेतात.


## स्त्री विरोधी हिंसा हे मानवी हक्कांचे उल्लंघन

लैंगिक हिंसा पिडीत व्यक्तींच्या आरोग्य समस्या व त्यांचा आरोग्याचा हक्क हे महत्त्वाचे विषय आहेत. भारतात आरोग्याचा हक्क हा मुलभूत हक्क गणला जाता नाही. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने जीवित राहण्याच्या हक्कामध्ये आरोग्याचा हक्क समाविष्ट असल्याचे मानले आहे. भारताने मान्य केलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय हक्कविषयक करारांमध्ये आरोग्याचा हक्क समाविष्ट आहे - उदा. आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक करार (आयसीईएससीआर), महिलांविरोधी भेदभावाचे उच्चाटन करण्याचा जाहिरनामा (सीईडीएडब्ल्यु), बाल हक्कांचा जाहीरनामा (सीआरसी) व अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या हक्काचा जाहीरनामा (सीआरपीडी).

आरोग्याच्या हक्कामध्ये राज्यसंस्थेने कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांना मान्य व उपलब्ध असलेल्या दर्जेदार व रास्त शारीरिक व मानसिक आरोग्य सेवा निर्माण करणे अपेक्षित आहे. यात शारीरिक इजेवरील उपचार, लैंगिक आजारांवरील प्रतिबंधक उपाय व चाचण्या, तातडीचे गर्भनिरोधन व मनोसामाजिक सहाय्य यांचा समावेश आहे.

- जगात प्रत्येक तीनपैकी एका महिलेवर तिच्या निकटच्या जोडीदाराकडून किंवा परक्या व्यक्तीकडून शारीरिक आणि/किंवा लैंगिक अत्याचार होतो.
- हिंसेचे आरोग्यावर विविध परिणाम होतात जे तात्कालिक किंवा दीर्घकालीनही असू शकतात.
- भारत जगात गरोदरपणाच्या काळातील हिंसेचे सर्वाधिक प्रमाण असलेल्या देशांपैकी एक आहे.
- गरोदरपणातील कौटुंबिक हिंसा व गर्भपात, नवजात शिशुंचा मृत्यू, गर्भाच्या वाढीमधील दोष तसेच माता-मृत्यू यांचा जवळचा संबंध आहे.
- हिंसाग्रस्त स्त्रियांमध्ये आत्महत्येची शक्यता ही हिंसामुक्त स्त्रियांपेक्षा १२ पटींनी अधिक असते.
- अन्य देशांमध्ये झालेल्या अभ्यासांनुसार जोडीदारांकडून हिंसा झालेल्या स्त्रियांमध्ये नैराश्य, धास्ती व भयगंड निर्माण होण्याची शक्यता ही हिंसामुक्त स्त्रियांपेक्षा अधिक आढळली आहे.

स्त्रीविरोधी हिंसा व स्त्रिया यांच्यातील संबंध हे चक्राकार असतात. ज्याप्रमाणे हिंसेचे स्त्रियांच्या आरोग्यावर दूरगामी परिणाम होतात तसेच, मानसिक रोग, टी.बी., एचआयव्ही यासारख्या आरोग्य समस्या असलेल्या स्त्रिया हिंसेचे लक्ष्य ठरण्याची शक्यता अधिक असते.




'आरोग्य सेवा केंद्र' हे या कायद्याच्या अंमलबजावणीतील एक महत्त्वाचा घटक असून, या कायद्याच्या भाग २, विभाग ३(i), उपविभाग १७ नुसार हिंसेची बळी ठरलेल्या स्त्रीला कोणतेही आरोग्य केंद्र कोणत्याही परिस्थितीत उपचार नाकारू शकणार नाही. शिवाय गरज भासल्यास केंद्राच्या प्रमुख अधिकाऱ्याने 'डोमेस्टिक इंसिडेंट रिपोर्ट' तयार करून, तसा त्यापूर्वी नोंदवलेला नसल्यास, त्या भागातील संरक्षण अधिकाऱ्याकडे पाठविणे आवश्यक आहे.

## स्त्री विरोधी हिंसेला आरोग्य व्यवस्थेचा प्रतिसाद

हिंसेचा सामना करणाऱ्या स्त्रियांपर्यंत परिणामकारकरित्या पोहोचण्याकरिता केवळ आरोग्य सेवा कार्यकर्त्यांनीच नव्हे तर संपूर्ण आरोग्य संस्थेनेच बदलायला हवे. आरोग्य व्यवस्थेला आपले योगदान देण्याचे काही मार्ग खालीलप्रमाणे;

**स्त्री विरोधी हिंसा ही आरोग्य समस्या मानली जाण्याकरिता प्रशिक्षण**

- आरोग्य व्यावसायिकांकरता (डॉक्टर, नर्स, फिजिओ व ऑक्युपेशनल थेरेपिस्टस, समाजसेवक व कामगार वर्ग), लिंगभाव, मानवी हक्क, स्त्रीविरोधी हिंसा व त्याचा आरोग्यावरील परिणाम या विषयांवर प्रशिक्षण व जागरुकता निर्माण करणे.
- या प्रशिक्षणांचा वैद्यकीय व परिचारिका अभ्यासक्रमांमध्ये समावेशाकरिता प्रयत्न
- वस्ती पातळीवरील आरोग्य स्वयंसेवक/समूह विकास अधिकाऱ्यांना (CDO) वस्तीपातळीवर होणारा स्त्रीविरोधी हिंसाचार ओळखण्याकरिता प्रशिक्षण देणे, वस्तीमध्ये याविषयी जागरुकता निर्माण करण्यास त्यांना प्रोत्साहित करणे.

**स्त्री विरोधी हिंसाग्रस्त व्यक्ती लवकर ओळखणे**

- सर्व कर्मचाऱ्यांना अत्याचार ओळखण्याचे व त्यानुसार प्रतिसाद देण्याचे प्रशिक्षण
- बाह्य रुग्ण विभागामध्ये हिंसेमुळे दिसणारी/असणारी लक्षणे व तक्रारी याबद्दलची पोस्टर्स दर्शनी जागी लावणे. हिंसा होत असल्यास मदत मागण्यास प्रवृत्त करणारी हस्तपत्रके स्त्री रुग्णांना वाटणे.
- आत्महत्येचा प्रयत्न, भाजणे व बलात्कार यासारख्या हिंसा ओळखण्या करिता स्वतंत्र तपासणी होण्याची तरतूद त्यांच्या उपचारांकरिता असलेल्या आचारसंहितेत समाविष्ट करावी. कारण यामध्ये स्त्री विरोधी हिंसेचे प्रमाण अधिक तीव्र असण्याची शक्यता असते.

**भौतिक संरचना सुधारणे व आचारसंहिता निर्माण करणे**

- स्त्री विरोधी हिंसेला प्रतिसाद देण्याकरिता आचारसंहिता निर्माण करणे व त्याचे काटेकोरपणे पालन करणे.
- रुग्णाची सर्वसामान्य पूर्वमाहिती गोळा करण्याच्या पद्धतीमध्येच हिंसा ओळखण्याकरिता असलेले प्रश्न समाविष्ट करणे.

- हिंसेची संबंधित तपासणी करण्यामध्ये गुप्तता राखण्याकरिता बाह्य रुग्ण विभागामध्ये पुरेशी जागा उपलब्ध करणे. माहितीबाबत गुप्ततेचे योग्य पालन होईल अशा प्रशासकीय व माहिती संकलन व्यवस्था निर्माण करणे.

**हिंसाग्रस्त व्यक्तींना थेट सहाय्य**

- निरनिराळे स्त्रीगट, समुपदेशन व कायदेविषयक सल्ला देणाऱ्या संस्था व निवारा संस्थांशी समन्वय साधून तपासणीद्वारे ओळखलेल्या हिंसाग्रस्त स्त्रियांची आवश्यकतेनुसार पाठवणूक करणे.
- हिंसाग्रस्त स्त्रियांच्या वैद्यकीय, सामाजिक व भावनिक गरजां करता रुग्णालयामध्येच एक बहुक्षेत्रीय तज्ञ गट स्थापन करणे.

**समूहाचा दृष्टीकोन बदलणे**

- स्त्री विरोधी हिंसेविषयी जागरुकता निर्माण करण्याकरिता समूह आरोग्य स्वयंसेवकांना प्रोत्साहन देणे.
- हिंसेला आळा घालण्याच्या दृष्टीने युवक गट तसेच अत्याचारी पुरुषांशी संवाद साधणे.
- स्त्री रुग्णांनी केलेल्या निवडीचा आदर करणे.
- आरोग्य व्यवस्थे अंतर्गत हिंसेच्या प्रति 'शून्य मान्यता' धोरण स्वीकारण्यास चालना देणे.

**हिंसा ओळखण्याकरिता विचारले जाऊ शकणारे संभाव्य प्रश्न**

**थेट प्रश्न**

- स्त्रियांच्या आयुष्यात हिंसा मोठ्या प्रमाणावर आढळत असल्याने सर्वच रुग्णांना आम्ही याबद्दल विचारावयास सुरुवात केली आहे.
- तुमच्या घरातील कोणत्याही व्यक्तीकडून तुम्हाला लाथा, बुक्क्या, थपडा, ढकलणे किंवा इतर कोणत्याही प्रकाराने इजा पोहोचवण्यात आली आहे का?
- तुमच्या जोडीदाराने कधीही तुमची इच्छा नसताना तुम्हाला लैंगिक संबंधास भाग पाडले आहे का? त्याने कधीही सुरक्षित लैंगिक संबंध ठेवण्यास नकार दिला आहे का?

**सूचक प्रश्न**

- तुम्हाला झालेली दुखापत अपघाती असेल असे वाटत नाही. तुमच्या दुखापतीच्या स्वरुपावरुन कोणीतरी तुम्हाला इजा पोहोचवत आहे अशी शक्यता वाटते. ही दुखापत कोणाकडून घडवली गेली आहे का?
- तुमच्या तक्रारी या तणावाशी संबंधित असाव्यात असे वाटते. तुमच्या जोडीदाराबरोबर किंवा कुटुंबामध्ये तुम्हाला काही तणाव जाणवत आहे का?

## स्त्री विरोधी हिंसा हाताळण्यात आरोग्य व्यवसायिकांची रुग्णांमध्ये भूमिका व कार्ये

**अत्याचार ओळखणे :** स्त्री रुग्णामध्ये अत्याचाराच्या खाणाखुणा ओळखण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. हिंसा होत असल्याचा संशय आल्यास संवेदनशीलतेने तिची चौकशी केली पाहिजे. अपघात, मानसोपचार, स्त्रीरोग, प्रसूतीपूर्व तपासणी विभागांमध्ये हिंसेला तोंड देणाऱ्या स्त्रिया आढळण्याची शक्यता असते. आपण किती संवेदनशीलता दाखवतो याच्याशी ती किती माहिती उघड करते हे अवलंबून असते. माहिती उघड केल्याने तिच्यावर ताशेरे ओढले जाणार नाहीत किंवा धोका पोहोचणार नाही याविषयी खात्री पटवा. अत्याचारांशी संबंधित शरम व धिक्कार लक्षात घेता वैयक्तिक दुःख तुमच्यासमोर उघड करण्यास ती तयार नसणे स्वाभाविक आहे. तिच्या सोबत असणाऱ्या व्यक्तींना खोलीबाहेर थांबण्याची विनंती करा. ते अत्याचार करणाऱ्यांपैकीच असू शकतात. घरी गेल्यावर तिला अधिक हिंसेला तोंड द्यावे लागू शकते. कदाचित पुन्हा कधीही तिला तुमच्याकडे येऊ दिले जाणार नाही व सहाय्य मिळण्याची संधी ती कायमची गमावू शकेल.

**भावनिक आधार :** स्त्रीच्या अनुभवाला महत्त्व देणे व तिच्यावर विश्वास ठेवणे हे तिला भावनिक आधार मिळण्याकरिता अत्यंत महत्त्वाचे ठरते. तिला मारहाण 'का' करण्यात आली असे तिला कधीही विचारु नये कारण मारहाणीसाठी नकळत तिलाच जबाबदार ठरविले जाते व हा तिचाच दोष आहे असे सूचित केले जाते. हिंसा होत असलेल्या कुटुंबात राहणे तिला अत्यंत कठीण जात असेल हे मान्य करावे परंतु ती एकटी नसून तिला मदतही उपलब्ध आहे असा विश्वास तिला देणे महत्त्वाचे आहे.

**वैद्यकीय देखभाल :** स्त्रीच्या सर्व दुखापतींवर उपचार करणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. तसेच संवेदनशीलपणे तिची संपूर्ण माहिती घेणे ही गरजेचे आहे. सध्या व पूर्वी घडलेल्या हिंसेची माहिती विचारणे आवश्यक आहे. आधीच्या हिंसेमुळे झालेल्या दुखापती तसेच खाणाखुणांकडे लक्ष ठेवून त्यावरही उपचार करावा. ज्या महिला पूर्वीपासून किंवा जोडीदाराकडून होणाऱ्या हिंसेमुळे मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आहेत (जसे-उदासीनता, मद्यपानाचा वापर) किंवा

जोडीदाराकडून होणारी हिंसा अनुभवत आहेत त्यांना हिंसेची योग्य समज असणाऱ्या आरोग्य व्यावसायिकांकडून मानसिक आरोग्याची सुविधा पुरवली गेली पाहिजे.

**नोंदी :** हिसेंच्या नोंदी ठेवण्यात आरोग्य सेवकांना महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. हिंसाग्रस्त स्त्रीने कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतल्यास या नोंदी हिंसा झाली आहे हे सिद्ध करण्यासाठी महत्त्वाचा (व अनेकदा एकमेव) पुरावा ठरु शकतात. हिंसेमुळे झालेल्या कोणत्याही इजेची तक्रार घेऊन आलेली प्रत्येक स्त्री ही मेडिको लीगल केस म्हणून नोंदवली गेली पाहिजे. रुग्णालयात करुन घेतलेल्या कोणत्याही नोंदीचा उपयोग ती न्यायालयात पुरावा म्हणून करु शकते याची तिला माहिती द्या. घडलेल्या घटनाक्रमाची माहिती हिंसाग्रस्त स्त्रीकडून नोंदवून घेताना तिला झालेल्या दुखापतीचे तपशील तसेच हिंसक प्रसंगाचे तपशीलही समाविष्ट करावेत. तपासणीतील निदानाबरोबरच वरील सर्व तपशीलही मेडिको लीगल केस रजिस्टरमध्ये तसेच केस पेपरवर नोंदवावेत.

**माहिती द्या व पाठवणी करा :** कोणत्याही कारणास्तव हिंसेचे समर्थन होऊ शकत नाही. हिंसा ही बेकायदेशीर असून पोलिसांकडे जाऊन अदखलपात्र तक्रार (एन.सी.) तसेच प्राथमिक माहिती अहवाल (एफ.आय.आर.) या दोन्ही प्रकारच्या तक्रारी दाखल करण्याचे महत्त्व समजावून सांगितले गेले पाहिजे.

हिंसाग्रस्त स्त्रीला 'कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायद्याची' व त्यातील तिच्या अधिकारांची माहिती द्यावी. सुरक्षिततेसंबंधी चौकशी करुन घरी परत जाणे तिला सुरक्षित वाटत नसल्यास निवारा देणाऱ्या ठिकाणांची माहिती द्यावी व शक्य असल्यास एखाद्या ठिकाणी तिची पाठवणी करावी. कायदेविषयक मदत, हिंसाग्रस्त स्त्रियांकरिता समुपदेशन सेवा व सहाय्य गट यांची माहितीही द्यावी.

## आरोग्य व्यवस्था व अन्य कायदेशीर व्यवस्थांमधील आंतरसंबध

**पोलिस**

- पिडीत व्यक्ती तक्रार घेऊन पोलिसांकडे आल्यास तातडीने आरोग्य केंद्रात तपासणी, उपचार व काळजी करिता न्यावे. विलंब केल्यास हिंसाग्रस्त व्यक्तीचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.
- पिडीत व्यक्तीची अन्य आरोग्य केंद्रात तपासणी झाली आहे का, तेथील कागदपत्रे तिच्याकडे उपलब्ध आहेत का, हे आरोग्य व्यावसायिकांनी विचारणे तसे असल्यास, पोलिसांची मागणी म्हणून पुन्हा तपासणी करु नये व तसे पोलिसांना स्पष्ट करून सांगावे.
- हिंसेचा इतिहास घेताना, तपासणी, पुरावे गोळा करणे व उपचार करीत असताना पोलिसांनी तेथे हजर राहू नये. हिंसाग्रस्त व्यक्तीची माहिती गोपनीय ठेवणे व संपूर्ण प्रक्रियेत खाजगीपणा पाळणे महत्त्वाचे आहे.
- पुरावे गोळा करुन झाल्यावर पोलिसांनी हिंसाग्रस्त व्यक्तीचे उपचार पूर्ण होईपर्यंत रुग्णालयात थांबावे.
- साक्षीदार म्हणून पोलिसांची सही घेऊ नये. हिंसाग्रस्त व्यक्तीचे हित जपण्याकरिता ज्येष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्याने किंवा अन्य आरोग्य व्यवसायिकाने सही करावी.
- 'बलात्कार झाला आहे का' वा 'हिंसाग्रस्त व्यक्ती लैंगिक संबंध करण्यास सक्षम आहे का' अशा पोलिसांच्या प्रश्नास आरोग्य व्यावसायिकांनी थारा देऊ नये. न्याय वैद्यकीय पुराव्यांचे स्वरूप, त्याच्या मर्यादा व तज्ञ म्हणून तपासणी करणाऱ्या डॉक्टरांची भुमिका हे समजावून सांगावे.

**सरकारी वकील**

- हिंसाग्रस्त व्यक्तीने डॉक्टर, पोलिस व दंडाधिकारी यांनी दिलेल्या हिंसेच्या नोंदींचा डॉक्टरांनी अभ्यास करून नोंदीत तफावत असल्यास सरकारी वकिलांशी आधीच चर्चा करुन स्पष्टीकरण घेतले पाहिजे. डॉक्टरांवरच्या विश्वासामुळे पोलीस किंवा दंडाधिकारी यांच्यापेक्षा हिंसाग्रस्त व्यक्तीने डॉक्टरांना अधिक माहिती सांगितली असण्याची शक्यता असते.
- तपासणी केलेल्या डॉक्टरांनी केसची कागदपत्रे नीट वाचून तयारी केली पाहिजे व सरकारी वकिलांना काय अपेक्षित आहे यावर चर्चा केली पाहिजे.

**कायदेव्यवस्था**

- कायद्याने डॉक्टरांना "तज्ज्ञ साक्षीदार" म्हणून मान्यता आहे. सीआरपीसी कलम १६४ अ नुसार, तपासणी करणाऱ्या डॉक्टरांनी विनाविलंब वैद्यकीय निदानानंतर खालील माहिती देणे गरजेचे आहे.
  - हिंसाग्रस्त व्यक्तीस मादक पदार्थ/दारु इ. दिले असल्यास पुरावा
  - बौद्धिक किंवा मानसिक अपंगत्व असल्याचा पुरावा
  - शारीरिक इजांचे पुरावे, उदा. खरचटणे, मुका मार, कापणे, जखमा, दुखरेपणा, सूज, लघवी/शौच करताना जळजळणे, गर्भधारणा इ.
  - हिंसाग्रस्त व्यक्तीकडे वयाचा पुरावा नसल्यास, न्यायालयाचा आदेश असल्यास वय निश्चिती करणे
- हिंसक व्यक्तीने वापरलेली पद्धत, भीती, धक्का, आश्चर्य किंवा अन्य परिस्थितीमुळे हिंसाग्रस्त व्यक्तीने प्रतिकार केला नसल्याची शक्यता, यावर इजेचा आभाव आधारित असतो.
- न्याय सहाय्यक प्रयोगशाळेने दिलेल्या नकारात्मक निष्कर्षावरही डॉक्टरांनी निष्कर्षावरही वैद्यकीय मत द्यावयाचे असते. रुग्णालयात येण्यास झालेला विलंब, हिंसाग्रस्त व्यक्तीने हिंसेनंतर केलेल्या कृती, उदा. लघवी, अंग/लैंगिक अवयव धुणे, अंघोळ, कपडे बदलणे याने पुरावा नष्ट होऊ शकतो. आरोपीने निरोध वापरला असल्यास, नसबंदी झाली असल्यास, शुक्रवाहिनीचा आजार असल्यास, किंवा आंतर प्रवेशानंतर वीर्य उत्सर्जन केले नसणे ही नकारात्मक निष्कर्षाची कारणे असू शकतात.
- सर्वसाधारण तपासणीतील निष्कर्ष लैंगिक हिंसा झाली असल्याचे खात्रीने सांगू शकत नाही तसेच हिंसा झाली असण्याची शक्यता नाकारु शकत नाहीत. 'बलात्कार' कायदेशीर संज्ञा असून, तो झाला असण्याबद्दल वैद्यकीय मत व्यक्त केले जाऊ शकत नाही हे स्पष्ट केले पाहिजे.

**बाल कल्याण समिती**

- आरोग्य व्यवसायिकांनी हिंसाग्रस्त मुलास समजावले पाहिजे की, त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांविषयी बाल कल्याण समितीस सांगणे आवश्यक असते कारण त्यामुळे बालकांची तपासणीकरिता पाठवणूक करुन समिती त्यांच्या सुरक्षेकरिता योग्य ती पावले उचलू शकते.
- आरोग्य व्यवसायिकांनी वैद्यकीय पुराव्यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या पाहिजेत. लैंगिक हिंसा झाल्याचा वैद्यकीय पुरावा आढळला नाही याचा अर्थ बालक खोटे बोलत आहे असा होत नाही.

## स्त्री विरोधी हिंसा हाताळण्याकरिता भारतातील कायदे



**कौटुंबिक हिंसेपासून महिलांची सुरक्षा कायदा २००५ :** विवाहित, अविवाहित, लग्नाशिवाय जोडीदाराबरोबर एकत्र राहणाऱ्या तसेच वडील किंवा भाऊकडून हिंसा होणाऱ्या महिलांना हा कायदा लागू आहे. शारीरिक, लैंगिक, भावनिक, आर्थिक, कोणत्याही प्रकारची हिंसा होत असलेली महिला सुरक्षा अधिकारी/दंडाधिकारी/सेवा पुरवठादार यांकडे तक्रार करु शकते. यात महिलांना विविध आदेशांच्या स्वरुपात मदत मिळू शकते. उदा. वास्तव्याचा आदेश, आर्थिक मदत, ताबा घेण्याचा आदेश, भरपाईचा आदेश, मध्यावधी/एक्सपार्टी आदेश इत्यादी.

**भारतीय दंडविधान, कलम ४९८ अ :** छळ करणारा नवरा / किंवा त्याच्या नातेवाईकांविरुद्ध महिला तक्रार दाखल करु शकते. आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्यास किंवा तिच्या जीवाला वा शरीराला धोका जाणवल्यास किंवा तिच्याकडून मालमत्ता किंवा मौल्यवान वस्तूंची मागणी केली जात असल्यास या कलमा खाली तक्रार केली जाऊ शकते. शिक्षा : ३ वर्षे कारावास व दंड.

**हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ :** कायदा हुंडा देण्यावर किंवा घेण्यावर बंदी घालतो. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वधू/वराच्या आई वडिलांकडे, नातेवाईकांकडे किंवा पालकांकडे हुंड्याची मागणी करणे बेकायदेशीर आहे. शिक्षा : ६ महिने ते २ वर्षापर्यंत कारावास, दहा हजार रुपयापर्यंत दंड.

**बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२९ :** प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे बालविवाह करणाऱ्या व्यक्तीस जर त्याने हा बालविवाह आहे हे आपल्याला माहित नसल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केले तरच यातून मुक्तता मिळू शकेल. शिक्षा : एक महिन्यापर्यंत साधा कारावास किंवा एक हजार रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही.

**गर्भपूर्व व प्रसूतीपूर्व चाचणी (लिंगनिवड चाचणी प्रतिबंधक) कायदा १९९४ :** गर्भामधील व्यंग शोधण्याकरिता प्रसूतीपूर्व चाचण्यांच्या, तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या आरोग्य व्यावसायिकांवर नियंत्रण ठेवण्याकरिता या कायद्याचा वापर केला जातो. अशा चाचण्या केल्या जात असल्याचे कोणालाही आढळल्यास योग्य त्या अधिकाऱ्यांकडे तक्रार केली जाऊ शकते.

**कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरोधी (प्रतिबंध, मज्जाव व तक्रार निवारण) कायदा, २०१३ :** प्रत्येक कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची प्रकरणे हाताळण्याकरिता एक समिती गठीत करणे बंधनकारक आहे. जेथे छळ होणारी महिला या समितीकडे तक्रार करु शकते. समिती अस्तित्वात नसल्यास महिला तालुका स्तरावर स्थापन केलेल्या तक्रार निवारण समितीकडे जाऊ शकते. महिला लेखी तक्रार दाखल करुन बदली, रजा यासारख्या सवलतींची मागणी करु शकते.

**सती प्रतिबंधक कायदा १९८७ :** सती जाण्यास, त्या करता उत्तेजन देण्यास किंवा सती जाण्याचा गौरव करण्यास कायद्याद्वारे बंदी घालण्यात आली आहे. गुन्हा घडल्यास खटला चालविण्याकरिता विशेष न्यायालयांची तरतूद आहे. अशा गुन्ह्यांची दखल किंवा प्रतिबंध, जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी करु शकतात. शिक्षा : मृत्युदंड, जन्मठेप, कारावास व तीस हजार रुपयापर्यंत दंड.

**बलात्कार, भारतीय दंड विधान, कलम ३७५ :** बलात्काराच्या कायद्यात सुधारणा (क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट-सीएलए) म्हणून २०१३ साली काही बदल करण्यात आले. यात बलात्काराची व्याख्या विस्तृत केली गेली असून त्यात सर्व प्रकारच्या लैंगिक हिंसेचा म्हणजे वस्तू/शस्त्रे/बोटे वापरुन केलेला (मौखिक, गुद्दवारातील, योनिमार्गातील) अंतरप्रवेश किंवा अंतरप्रवेशाशिवाय स्पर्श, कुरवाळणे, पाठलाग करणे यांचा समावेश आहे. महिलेला तिच्या इच्छेविरुद्ध यापैकी काहीही करायला लावणे या कायद्याच्या कक्षेत येते. सामूहिक बलात्कार (कलम ३७५ ड) हा एक स्वतंत्र गुन्हा कठोर शिक्षेसह यामध्ये अधिनियमित करण्यात आला आहे.

**महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेला बळाचा वापर किंवा हल्ला, भारतीय दंड विधान कलम ३५४ :** बळाचा वापर करून एखाद्या महिलेस विवस्त्र करणे, चोरुन अश्लील दृश्य किंवा खाजगीतील वर्तन पाहणे व पाठलाग करणे हे शिक्षेस पात्र आहे. शिक्षा : १ ते ५ वर्षापर्यंत कारावास आणि दंड.

**बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून संरक्षण कायदा २०१२ (पोक्सो) :** कायदा बालकांकरिता (१८ वर्षाखालील, दोन्ही लिंगाची बालके) असून लैंगिक हेतूने केलेली सर्व कृत्ये यात शिक्षेस पात्र आहेत. जसे अंत:प्रवेश असलेला लैंगिक हल्ला, लैंगिक हेतूने अन्त:प्रवेश न करता केलेला शारीरिक स्पर्श, लैंगिक छळ, अश्लील साहित्य निर्मितीत बालकांचा वापर. यात बालकांच्या इच्छेचा विचार केला जात नाही.

## समुपदेशन

क्लेश कमी करणे व स्वास्थ्य वाढविणे या उद्देशाने केलेला संवाद म्हणजे समुपदेशन. कौटुंबिक हिंसेकरता करावयाच्या समुपदेशनात हिंसेचा सामना करीत असलेल्या व्यक्तीच्या बहुआयामी गरजांना प्रतिसाद देणे अभिप्रेत असते. काही गरजांकरिता सल्लार्थींची अन्य ठिकाणी पाठवणूक करावी लागते. कौटुंबिक हिंसेचे समुपदेशन हे व्यक्तीच्या पलीकडे जाऊन महिलांना हे समजण्यास मदत करते की त्यांच्या विपरीत परिस्थितीचे मूळ हे त्यांच्या निकटच्या नातेसंबंधातील असमान सत्ता व नियंत्रण यामध्ये असते व त्याला व्यापक सामाजिक संदर्भ असतात.

**स्त्री विरोधी हिंसा हाताळण्याकरिता समुपदेशनाची गरज**

स्त्री विरोधी हिंसा ही एक नित्याचीच बाब झाली आहे. हिंसेचा अतिरेक झाल्याने कंटाळून शेवटी स्त्रिया काही वेळा स्वतःला इजा करुन घेतात. स्वतःवर चाकूचे वार करणे, उपाशी राहणे, स्वतःला बंदिस्त करुन घेणे, इतरांच्यात न मिसळणे व सरतेशेवटी आत्महत्येचा प्रयत्न करणे अशा गोष्टी करतात. रुग्णालयात विषबाधा होऊन आलेल्या बऱ्याच स्त्रिया मारहाण व अत्याचाराच्या बळी असतात. स्त्रियांना भावनिक आधार देऊन, पुन्हा जगायला शिकविणे, आत्महत्येची वेळ येण्याआधी मदतीसाठी प्रवृत्त करणे गरजेचे आहे. "तुझी यात काहीही चूक नाही, तू स्वतःला असहाय्य समजू नको. स्वतःवर विश्वास ठेव, समस्या सोडविता येतात. मार्ग काढता येतो" असे प्रोत्साहन समुपदेशनाद्वारे देण्याची गरज आहे.

**स्त्रीवादी समुपदेशनाची गरज**

या पद्धतीमध्ये नातेसंबंधातील असमानता व सत्तेची उतरंड यांना आव्हान दिले जाते. स्त्रीवादी समुपदेशनातून सल्लार्थीस हे समजणे गरजेचे असते. की हिंसेचे कारण त्यांच्या बाह्य परिस्थितीत असून हिंसेची मुळे पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये रुजलेली असतात.

**समुपदेशनातील मुल्ये**

**स्वायत्ततेचे मूल्य :** सल्लार्थींना आपल्या आयुष्यातील सर्व पैलू व घटनांविषयी निर्णय घेण्याचा हक्क आहे.

**इजा न पोहोचवण्याचे मूल्य :** समुपदेशिकेकडून घडलेल्या/घडू न शकलेल्या कृतीमुळे सल्लार्थीस इजा पोहोचू नये याची काळजी घेणे हे समुपदेशिकेचे कर्तव्य आहे.

**हित जपण्याचे मूल्य :** सल्लार्थीच्या भल्याचा विचार व तिच्या हितसंबंधांची जपणूक करणे हे समुपदेशिकेचे कर्तव्य आहे.

**सत्यता व विश्वासार्हतेचे मूल्य :** समुपदेशनाच्या नात्यामध्ये समुपदेशिकेने प्रामाणिक व एकनिष्ठ असावे.

**न्यायाचे मूल्य :** समुपदेशिकेने सल्लार्थीमध्ये वर्ग, जात, वैवाहिक स्थिती, लैंगिक कल, धर्म, समूह, अपंगत्व इ. आधारित भेदभाव करु नये.

**समुपदेशन करताना समुपदेशिकेने पाळावयाची तत्वे**

**आत्मभान :** समुपदेशिकेस स्वत:च्या बलस्थानांची व मर्यादांची जाणीव असावी.

**गोपनीयता :** समुपदेशिकेने सल्लार्थीने दिलेल्या माहिती विषयी (सशर्त) गुप्तता पाळावी.

**एकमेवता :** प्रत्येक स्त्रीचा लढा वेगळा असतो याची जाणीव समुपदेशिकेने बाळगावी.

**स्व-निश्चय :** समुपदेशिकेने परिस्थितीवर तोडगा काढण्याच्या सल्लार्थीच्या क्षमतेविषयी आदर बाळगावा.

**विविधतेची दखल :** समुपदेशिकेने सल्लार्थीच्या विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक व लैंगिक ओळखी तसेच पार्श्वभूमींची दखल घ्यावी.

**लिंगभेदात्मक विचारसणीस आव्हान देण्याविषयी बांधिलकी :** समुपदेशिकेने स्वत:मधील लिंगभेदात्मक मुल्यांचा शोध घेऊन पारदर्शकतेने स्त्रीवादी विचारसरणी अंगीकारावी.

**सत्तासंबंध ओळखणे :** समुपदेशिकेच्या स्वत:च्या जात, वर्ग, धर्म, शिक्षण यासारख्या घटकांमुळे तिला मिळणाऱ्या सत्तेविषयी तसेच तिच्या व सल्लार्थीच्या सत्तास्थानातील तफावती विषयी जागरुक असावे.

**जबाबदारी :** समुपदेशनाच्या प्रक्रियेमध्ये बाह्य जगातील राजकीय चळवळी व सामाजिक संरचनांचे संदर्भ लक्षात घेण्याची जबाबदारी समुपदेशिकेने पाळावी.

## स्त्रीवादी समुपदेशनातील तंत्रे

**कारणीभूत घटक ओळखणे :** काही वेळा महिला स्पष्टपणे प्रश्न मांडत नाहीत कारण त्यांना आपल्यावर कोणी विश्वास ठेवेल याची खात्री नसते. हिंसेस आपणच कारणीभूत आहोत असे त्या समजत असतात व खरी हकीकत सांगण्यास कचरतात. मुलगा किंवा मुल न होणे, हुंडा हवा असणे, अश्लील चित्रफितीत दाखवून त्याप्रमाणे शरीरसंबंध करावयाची जबरदस्ती करणे, नवऱ्याला गुदद्वारामार्गे शारीरिक संबंध करण्यास नकार ही कारणे हिंसेस सुरुवात होण्यामागे असू शकतात.

**निभाव यंत्रणांचा शोध :** हिंसक परिस्थितीत राहणारी महिला आपली परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न करीत असते. समुपदेशिकेने महिलेचे कथन लक्षपूर्वक ऐकून, महिलेने आतापर्यंत हिंसेचा सामना कशा प्रकारे केला याची कल्पना समुपदेशिकेस येऊ शकते. सतत हिंसेचा सामना करणाऱ्या महिलेची निभाव यंत्रणा कोलमडत असल्याची लक्षणे समुपदेशिकेस ओळखता यायला हवीत. निभाव यंत्रणा व पळवाटा यातील फरक समुपदेशिकेने समजून घेऊन महिलेसही तो समजावून सांगितला पाहिजे.

**वैयक्तिक दडपशाहीचा लिंगभावाशी संबंध :** हिंसा ही एखाद्या व्यक्तीचे स्वत:वरील नियंत्रण सुटणे अशी केवळ वैयक्तिक स्वरुपाची कृती नसून, समाजाने घालून दिलेल्या भूमिका महिलांना बळजबरीने मान्य करायला लावण्याची ती एक पद्धत आहे, हे स्पष्ट करणे हा समुपदेशनाचा उद्देश असायला हवा. होत असलेली हिंसा ही समाजाने रुढ केलेल्या लिंगभावात्मक भूमिकांशी निगडीत आहे हे समुपदेशिका महिलेच्या आयुष्यातील उदाहरणे घेऊन उलगडून दाखवू शकते.

**डळमळीतपणा हाताळणे :** नातेसंबंधाचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा असल्याने हिंसक नात्यांमध्ये बदल करण्याच्या किंवा ते संपवण्याचा निर्णय घेणे हिंसाग्रस्त

महिलांना कठीण जाते. अंतिम निर्णय घेण्याबद्दल महिलांचे मन डळमळीत असल्याचे अनेकदा दिसून येते. या डळमळीतपणाच्या कारणांबद्दल समुपदेशिकेस पूर्ण कल्पना असेल तर परिस्थिती हाताळण्यास ती महिलेला अधिक सक्षम बनवू शकते. घटस्फोट, घर सोडणे, मुलांना आश्रयगृहात दाखल करणे आवश्यक असल्याचे मनातून पटले असले तरी ऐन वेळी महिला माघार घेऊ शकतात. समुपदेशिकेने निर्णय बदलल्याबद्दल महिलेस न रागावता मानसिक तयारी करण्यास वेळ देणे गरजेचे असते. मनाची तयारी झाल्यावर ती परत आली तरी तिला मदत मिळेल हा विश्वास देणे गरजेचे असते.

**लैंगिक अत्याचारांचा शोध :** महिला तिच्यावर होणाऱ्या हिंसेबद्दल बोलत असते तेव्हा समुपदेशिकेने लैंगिक हिंसेची शक्यता पडताळली पाहिजे. पुरेसा विश्वास वाटल्याशिवाय महिला लैंगिक हिंसेविषयी सहजपणे बोलत नाहीत. लैंगिक हिंसेचा सामना करण्याकरिता समुपदेशनाद्वारे महिलांना बोलण्यास सहाय्य केले पाहिजे. त्याविषयी वाटणाऱ्या शरम किंवा अपराधीपणाच्या भावनेतून त्यांना मुक्त केले पाहिजे.

**हिंसेशी सामना :** हिंसा टाळण्याकरिता अनेक महिला त्या परिस्थितीत स्वतःला मिटून घेतात, तसे करण्याने हिंसेला कारण मिळणार नाही. हिंसक व्यक्तीला खुश ठेवल्यास हिंसा थांबेल असे त्यांना वाटते. हिंसा तात्पुरती टाळण्याच्या युक्त्या हिंसा कमी करण्याकरिता यशस्वी ठरत नाहीत हे समुपदेशनातून स्पष्ट केले गेले पाहिजे. उलट हिंसेचा प्रतिकार केल्यास पुन्हा तसे करताना हिंसक व्यक्ती दोन वेळा विचार करते.

**महिलांची सामाजिक ओळख प्रस्थापित होण्याच्या प्रक्रियेचे अवलोकन:** जात, धर्म, वर्ग, लैंगिक कल याविषयी समाजात रुढ असलेल्या समजुतींमुळे जे फायदे किंवा तोटे वाट्याला येतात त्यात देखील हिंसाग्रस्त महिला विभागलेल्या असतात. त्याचप्रमाणे उच्च वर्ग, जात, बहुसंख्यांक, भिन्नलिंगी कल असलेल्या महिलांशी बोलताना त्यांच्या 'इतर महिलांविषयी' असलेल्या पूर्वग्रहांबद्दल चर्चा केली पाहिजे.

## लैंगिक हिंसाग्रस्त व्यक्तींची मनोसामाजिक काळजी

**पोषक वातावरण निर्माण करणे व विश्वास प्रस्थापित करणे**

आरोग्य व्यावसायिकांनी :

- हिंसाग्रस्त व्यक्तीशी खाजगी ठिकाणी बोलले पाहिजे.
- अनेक अडथळे पार करुन तुमच्यापर्यंत पोहोचल्याबद्दल तिच्या धैर्याचे कौतुक केले पाहिजे.
- हिंसेच्या प्रसंगाची तक्रार नोंदविताना मनाची होणारी चलबिचल समजून घेतली पाहिजे. पोलिसांना माहिती देण्यास तिने नकार दिला म्हणून तिची तक्रार खोटी समजू नये.
- उपचारांमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही याची हिंसाग्रस्त व्यक्तीस खात्री द्यावी.
- हिंसाग्रस्त व्यक्तीस उपलब्ध संसाधने, पाठवणूक करण्यायोग्य संस्था, कायदेशीर हक्क या सर्वांबद्दल माहिती द्यावी ज्यायोगे ती माहितीपूर्ण निर्णय घेऊ शकेल.

**वैद्यकीय प्रक्रियांचा उलगडा करुन सांगणे व त्या उपलब्ध करुन देणे**

आरोग्य व्यावसायिकांनी :

- हिंसाग्रस्त व्यक्तीस अंतर्गत तपासणी करीता तयार करुन तपासणीचे विविध टप्पे समजावून दिले पाहिजेत.
- एक्स रे, सोनोग्राफी, वय निश्चिती यासारख्या चाचण्यांकरिता अन्यत्र पाठवणूक करण्यामागील कारणे समजावून सांगितली पाहिजेत.
- अल्पवयीन मुलांच्या प्रेमप्रकरणांमध्ये अनेकदा दोघांच्याही संमतीने लैंगिक संबंध झालेले असू शकतात. अशा वेळेस वैद्यकीय तपासणी करण्याची व पोलिसांत तक्रार देण्याची मुलीची इच्छा नसल्यास त्याकरिता जबरदस्ती करु नये. अनेकदा वैद्यकीय तपासणी करण्यासाठी किंवा पोलिसात तक्रार करण्यास आपण नकार देऊ शकतो हे हिंसाग्रस्त व्यक्तीस माहितही नसते. जबाबदारीपूर्ण लैंगिक संबंध म्हणजे काय हे समजावून सांगणे अधिक सहाय्यकारी ठरु शकते. पोलिसात तक्रार करण्याचे फायदे/तोटे समुपदेशिकेने समजावून सांगणे आवश्यक असते व तक्रार करण्याची इच्छा असल्यास सर्वतोपरी सहाय्य केले जाईल याचा विश्वास देणेही आवश्यक असते.

**हिंसाग्रस्त व्यक्तींचे भावनिक स्वास्थ्य जपणे**

आरोग्य व्यावसायिकांनी :

- हिंसाग्रस्त व्यक्ती संमिश्र भावनांचे प्रदर्शन करु शकतात याची जाणीव ठेवणे
- हिंसाग्रस्त व्यक्तीस आपल्या भावना व्यक्त करण्यास प्रोत्साहन देणे
- आपत्कालीन समुपदेशन सेवा घेण्यास सुचविणे
- आत्महत्येच्या भावना तपासून पाहणे
- सुरक्षा चाचणी व सुरक्षा आराखडा बनविणे
- उपचारांच्या प्रक्रियेत कुटुंब व मित्र परिवारास सामावून घेणे

**सुरक्षितता चाचणी करणे :**

सुरक्षितता चाचणीतून तिला अजूनही धोका आहे व लैंगिक हल्ल्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे असे आढळले तर आरोग्य व्यवसायिकांनी तिच्या राहण्याची पर्यायी व्यवस्था करण्यास मदत केली पाहिजे. उदा. तात्पुरते रुग्णालयात दाखल करुन घेणे किंवा निवारागृहामध्ये पाठवणूक करणे. परंतु, काही हल्लाग्रस्त व्यक्ती घरी जाणेच पसंत करु शकतात. विशेषतः ज्यांच्यावर मुले किंवा अन्य व्यक्ती अवलंबून असतात.

**लैंगिक हिंसा होणाऱ्या व्यक्तीची मनोसामाजिक काळजी-उदाहरण**

मेरीचा नवरा बळजबरीने लैंगिक संबंध करायचा. तिला वेदना होत असत. लहान घर व एकत्र कुटुंब यामुळे तिला लैंगिक संबंध करण्यास अवघड वाटत असे. एका रात्री तिने जीवन संपविण्याचा प्रयत्न केला. नवऱ्याला शरीर संबंध करण्यास नकार देणे अवघड असू शकते. हे समुपदेशिकेने मान्य करण्याने मेरीस पाठींबा दर्शविला जाईल. शरीरसंबंध नकोसे वाटतील तेव्हा स्पष्ट सांगण्याचा आत्मविश्वास तिच्यामध्ये पुन्हा निर्माण केला पाहिजे. नवऱ्याशी लैंगिक संबंधाबद्दल बोलण्यास, आत्महत्येच्या प्रयत्नामागील कारण तिच्या कुटुंबियांना समजावून सांगण्यास तिला प्रोत्साहित केले पाहिजे. आयुष्य संपविण्याचे विचार पुन्हा मनात येऊ शकतात, त्यावर विजय मिळविण्याची तंत्रे देखील उपलब्ध आहेत हे समुपदेशिकेने मेरीस समजावून सांगितले पाहिजे. आत्महत्येचे विचार मनात आल्यास आपले मन आवडत्या गोष्टी करण्यामध्ये गुंतविणे, समुपदेशिकेस किंवा मैत्रिणीस भेटणे, फोन करणे यामुळे देखील मनातील आत्महत्येचे विचार दूर करण्यास मदत होऊ शकते हे ही तिला सांगितले पाहिजे.

# सुरक्षितता चाचणी व नियोजन

महिलेला हिंसेचा धोका आहे का हे जाणून घेण्याकरिता सुरक्षितता नियोजन महत्त्वाचे ठरते. पुढील हिंसा रोखण्याकरिता किंवा तिचा प्रतिकार करण्याकरिता महिलांना याद्वारे साधन प्राप्त होते. हे बहुतेक वेळा दोन पातळ्यांवर केले जाते. वाढत्या हिंसेचा शारीरिक धोका व वाढत्या हिंसेमुळे महिलांनी आत्महत्येचा प्रयत्न करण्याचा धोका.

**हिंसेची तीव्रता तपासणे**

प्रथम शाब्दिक हिंसेपासून सुरुवात होऊन, त्यानंतर थपडा मारणे, वस्तू किंवा शस्त्र वापरुन मारहाण करणे, जीव घेण्याच्या धमक्या देणे अशा प्रकारे हिंसेत उत्तरोत्तर वाढ झाली आहे का हे शोधल्यास हिंसेच्या तीव्रतेची कल्पना येते. हिंसा महिन्यातून, आठवड्यातून एकदा किंवा दररोज होते का, सध्या हिंसेत वाढ झाली आहे का हे जाणून घेतले पाहिजे. मारहाण का केली असे न विचारता मारहाण होण्यापूर्वी काय घडले असे विचारावे. यापूर्वी मारहाणीतून तिने स्वतःचा बचाव कसा केला होता, कोण मध्ये पडले, तिला रुग्णालयात कोणी दाखल केले, या माहितीवरुन समुपदेशिकेस महिलेची हिंसेला प्रतिकार करण्याची क्षमता व महिलेला उपलब्ध असलेले अन्य सहाय्य याची कल्पना येऊ शकते.

**पर्याय सुचविणे**

महिलेवरील हिंसेची तीव्रता, हिंसक नात्यामध्ये ती कोणत्या टप्प्यावर आहे व हिंसेचा प्रतिकार करण्याची तिची किती तयारी आहे या सर्व बाबी लक्षात घेऊन समुपदेशिकेने प्रत्येक महिलेकरिता पर्याय सुचविले पाहिजेत.

**१. हिंसाचक्र समजावून सांगणे**

हिंसक वर्तन चक्रीय असते व हे चक्र तोडल्याशिवाय हिंसा थांबणार नाही. हिंसेचा पहिला प्रसंग व त्यानंतर हिंसा करणाऱ्या व्यक्तीची प्रतिक्रिया आठवण्यास सांगावे. महिलेस हे समजवावे की एका टप्प्यावर घरातील वातावरण अतिशय तंग बनते. यानंतर वादावादी, भांडण व मग प्रत्यक्ष हिंसक कृती केली जाते. सुरुवातीच्या काळात हिंसक व्यक्तीला नंतर पश्चाताप होतो व कदाचित तो माफी देखील मागतो. याला 'मधुचंद्र' टप्पा म्हणतात ज्यामध्ये काही काळाकरिता हिंसक व्यक्तीच्या वागण्यात थोडी सुधारणा देखील होते. परंतु लवकरच हिंसा पुन्हा सुरु होते आणि मग एक चक्र तयार होते-हिंसा, माफी, पुन्हा हिंसा. जसजशी हिंसेची तीव्रता व वारंवारिता वाढते तसतसे हे चक्र लहान लहान होत जाते.

**सुरक्षितता नियोजनाची उदाहरणे**

रेश्माला मित्राने मारल्यावर ती समुपदेशिककडे आली. तिच्या गालावर जखम होती. ती म्हणते की तो माझ्यावर खूप मालकीहक्क गाजवितो. तिला ते आवडते त्यावरुन त्याचे तिच्यावर खूप प्रेम आहे असे तिला वाटते. पण आतापर्यंत तिला अशा प्रकारे कोणीही मारले नव्हते. नंतर त्याला तिला मारल्याबद्दल खूप वाईट देखील वाटते. समुपदेशिकेस रेश्माच्या मते प्रेम म्हणजे काय, कोणत्याही परिस्थितीत हिंसेचे समर्थन करता येईल काय याबद्दल बोलावे लागेल. त्याच्या "मालकीहक्का"बद्दल आणखी प्रश्न विचारल्यावर कळले की त्याला तिने आधुनिक पद्धतीचेच कपडे घालणे व तो सोबत नसताना बाहेर जाणे आवडत नाही. प्रेम असलेल्या व्यक्तीला असे वागविणे योग्य आहे काय असे विचारुन तिला याविषयी विचार करण्यास उद्युक्त केले पाहिजे. तो जेव्हा त्याच्या मित्रांबरोबर बाहेर जातो व तिला त्याबद्दल काहीही बोलण्याची परवानगी नसते तेव्हा तिला कसे वाटते. पूर्वीचे असे प्रसंग आठविण्यास रेश्माला सांगितले पाहिजे जेव्हा आकाशला खूप राग आला होता. यातून तिला एक विशिष्ट आकृतिबंध लक्षात येईल व आपण हिंसक नात्यामध्ये आहोत हे ती हळूहळू मान्य करु शकेल. तिच्या सुरक्षेकरिता काही सूचना द्याव्या लागतील. उदा. एखाद्या विश्वासू व्यक्तीस हिंसेची कल्पना देऊन ठेवणे तसेच त्याने हिंसक वर्तन बंद करेपर्यंत त्याच्यासोबत एकटीने बाहेर न जाणे.

राधाला पगाराचे दिवस जवळ आले की आता आपल्याला नवऱ्याकडून मारहाण सुरु होणार याची जाणीव होते असे. काही दिवस घरात अतिशय तंग वातावरण असल्याचे ती सांगते. समुपदेशिकेने राधाला सुचविले की काही दिवस तिने एखाद्या नातेवाईक किंवा मैत्रिणीला घरी राहण्यास बोलवावे. ह्याने मारहाण थांबविण्याकरिता कोणीतरी मदत करु शकेल. ती व्यक्ती अशी असली पाहिजे की जिला तिचा नवरा मारहाण करण्यास धजावणार नाही. राधाला वाटणारी पोलिसांची भीती समुपदेशिकेने हाताळली पाहिजे. पोलिसात तक्रार करुन तिच्या जीवाला धोका असून तिला लोखंडी सळीने व काठीने मारहाण झाली आहे हे सांगितले पाहिजे. राधाच्या परिस्थितीला योग्य ठरतील व तिला मान्य असतील असा अनेक पद्धतींचा विचार केला गेला पाहिजे.

## समुपदेशनातील आव्हाने

रुग्णालय स्थित समुपदेशन केंद्रासमोर असलेले प्रमुख आव्हान म्हणजे आत्महत्या करणाऱ्या महिलांचे समुपदेशन. मोठ्या प्रमाणात महिला या वैद्यकीय तक्रारीकरिता दाखल होतात (सरासरी दिवसाला एक). रुग्णालयात असताना समुपदेशिका त्यांच्या संपर्कात राहते परंतु एकदा रुग्णालय सोडून गेल्यानंतर त्यांचा पाठपुरावा करता येत नाही. या महिलांना समुपदेशनाची सर्वाधिक गरज असते. परंतु त्या केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाहीत. या महिलांशी संपर्क साधणे हे समुपदेशिकेसमोरील आव्हान ठरते.

विवाह व कुटुंब संस्थांमध्ये महिलांना फार कमी पर्याय उपलब्ध असतात. हिंसक नातेसंबंधांमधील महिलेने त्या नात्यातून बाहेर पडण्याचे ठरविले तर तिला राहण्याच्या व जेवण्याच्या सोयीकरीता देखील मार्ग शोधावे लागतात. तिच्यावर मुलांच्या जबाबदारीचे ओझे असते. पर्याय शोधण्याची जबाबदारी महिलेवरच येऊन पडते.

जोडीदाराची तयारी नसतानाही जोडीदाराबरोबरच राहण्याचा आग्रह धरणाऱ्या महिला हे समुपदेशनासमोर एक मोठे आव्हान असते कारण वाढती हिंसा व त्यांच्या जीवाला असलेला वाढता धोका देखील नजरेआड करुन महिला नातेसंबंध तोडण्यास अजिबात तयार होत नाहीत व एकत्र राहण्याचाच आग्रह धरून बसतात.

महिलेने कायदेशीर मदत मागणे हे देखील एक आव्हान असते. आमच्या अनुभवानुसार कायदेशीर मदत मिळणे ही एक अत्यंत कठीण प्रक्रिया असून त्यातून सकारात्मक फलिते मिळणे अत्यंत दुरापास्त असते. कायदेशीर मदत व तिची उपजीविका, रोजगार याकरिता मदत यांचा समतोल राखणे गरजेचे असते. परंतु अनेक महिलांना असे वाटते की त्यांनी कायदेशीर कारवाई केली तर हिंसक व्यक्ती हिंसा बंद करेल. कायदेशीर कारवाई सोबतच तिच्या उपजीविकेवर देखील लक्ष केंद्रित करण्यास महिलेला सांगणे हे एक आव्हान ठरते. हिंसक नातेसंबंधातील अविवाहित महिलांपर्यंत पोहोचणे आव्हानात्मक ठरते. आम्ही जरी कौटुंबिक हिंसेच्या प्रश्नावर काम करीत असलो, ज्यामध्ये घरातील भाऊ, वडील, जोडीदार यापैकी कोणाहीकडून

महिलेवर केलेली हिंसा समाविष्ट आहे. तरी दिलासाकडे येणाऱ्या बहुतांशी बाबी या विवाहित महिलांवर होणाऱ्या हिंसेच्याच असतात.

**आत्महत्या**

महिलांनी आत्महत्येचा प्रयत्न करण्याची समस्या तिला सहन कराव्या लागणाऱ्या हिंसेशी संबंधित आहे. महिलांनी आत्महत्येचा प्रयत्न करण्याची अनेक कारणे असतात जसे असह्य हिंसेपासून सुटका होण्याकरिता, मदतीची हाक म्हणून किंवा अतीव हिंसेमुळे जगण्याची इच्छा संपुष्टात आल्याने.

सर्वच जणी हा विचार कृतीत उतरवतात असे नव्हे, पण अनेकजणी करतातही. म्हणूनच अशा भावनांचा शोध समुपदेशिकेने घेतला पाहिजे. रुग्णालयामध्ये आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या महिलेस समुपदेशिकेकडे पाठविले जाते. महिलांना याबद्दल बोलणे अत्यंत कठीण जाते. शिवाय, अपराधीपणाची भावना, प्रयत्न अयशस्वी झाल्याबद्दल राग, घरचे कोणीच भेटण्यास न आल्यास असहाय्यता अशा भावनांचे ओझे देखील त्यांच्या मनावर असते.

आत्महत्येच्या प्रयत्नाविषयी अधिक माहिती शोधण्याकरिता विशिष्ट कौशल्ये आवश्यक असतात. यावर बोलणे कठीण असू शकते हे मान्य करुन, महिलांची बाजू किंवा त्यांचे म्हणणे ऐकून घेणारे कोणीच नसते म्हणून महिला आत्महत्येचा प्रयत्न करतात असे म्हणणे देखील उपयुक्त ठरु शकेल. अनेक महिलांना त्यांच्या परिस्थितीवर मार्ग काढू शकणाऱ्या सेवा उपलब्ध आहेत हे माहित नसते. आधार देणारे संभाषण केल्यास महिला त्यांनी असा प्रयत्न करण्यामागील कारणे सांगतात. तिची भावस्थिती, तिला दु:खी किंवा निराश वाटत आहे का, किंवा रडावेसे वाटत आहे का, तिला सोसाव्या लागणाऱ्या हिंसेमुळे असा प्रयत्न करण्याकडे ती ओढली गेली हे समुपदेशिकेने महिलेच्या लक्षात आणून दिले पाहिजे.

## समुपदेशन केंद्र चालविण्याचे आचार नियम, तातडीच्या व व्यवहार्य कृती

- प्रत्येक दिवशीच्या समुपदेशनाशी संबंधित सर्व नोंदींची टिपणे त्याच दिवशी पूर्ण केली पाहिजेत. आदल्या दिवशीची समुपदेशिका दुसऱ्या दिवशी तीच बाब हाताळण्यास उपलब्ध असेल असे नाही. टिपणे पूर्ण केली असतील तर कामावर असलेली समुपादेशिका योग्य ती सेवा पुरवू शकेल.
- महिलेस कदाचित पुढच्या भेटीत दुसऱ्या समुपदेशिकेशी बोलावे लागेल हे सांगणे गरजेचे आहे कारण त्या सर्व एकत्रपणे एक चमू म्हणून काम करतात. यामुळे दुसऱ्या समुपदेशिकेशी बोलण्याची महिलेची मानसिक तयारी होते.
- समुपदेशनास आलेल्या हिंसाग्रस्त महिलेवर रुग्णालयात संवेदनशीलपणे उपचार केले जातील याची खात्री करण्यामध्ये समुपदेशिकेची भूमिका महत्त्वाची ठरते.
- समुपदेशनास आलेल्या हिंसाग्रस्त महिलेवर झालेल्या हिंसेची नोंद न्याय वैद्यकीय बाब म्हणून करण्याकरता आवश्यक ती माहिती महिलेस देण्याची जबाबदारी समुपदेशिकांवर असते.
- समुपदेशिकेने महिलेस नोंदणी क्रमांक व समुपदेशन केंद्राची माहिती देणारे एक कार्ड देणे आवश्यक आहे. यामुळे तिची फाईल शोधणे समुपदेशिकेस सोपे जाते.
- केंद्रात नोंदल्या गेलेल्या नवीन व पाठपुरावा केलेल्या बाबी यांच्या तपशिलांच्या नोंदणी वह्या यामुळे केंद्र हाताळत असलेल्या बाबींची संख्या समजण्यास मदत होते.
- समुपदेशनाच्या सर्व नोंदी गोपनीय राखायच्या असल्याने नोंदणी अर्ज फाईलमध्ये लावून ती फाईल सुरक्षित ठिकाणी (कुलुपबंद कपाटात) ठेवणे ही समुपदेशिकेची जबाबदारी असते.
- केंद्रात एकावेळी २ समुपदेशिका उपलब्ध असल्या पाहिजेत. रुग्णालयात येणाऱ्या महिलांकडे वेळ कमी असतो. एका वेळी दोन महिला आल्यास त्यांना जास्त वेळ थांबावे लागता कामा नये. अन्यथा त्या न बोलताच निघून जाण्याची शक्यता असते.
- समुपदेशन करीत असताना पडणारे प्रश्न व शंका यांचे निरसन करुन हिंसाग्रस्त महिलांचे हितसंबंध जास्तीत जास्त जपण्याकरिता समुपदेशिकांनी हाताळलेल्या सर्व बाबींची समुपदेशकांच्या गटामध्ये (केस प्रेझंटेशन) मांडणी व चर्चा करणे आवश्यक आहे.

- समुपदेशनाकरिता येणाऱ्या महिलांची संख्या, त्यांच्या वैद्यकीय तक्रारींचे स्वरुप इ. बद्दल समुपदेशिकांनी आरोग्य सेवा पुरवठादारांसोबत बोलले पाहिजे. जेणेकरुन त्यांना या विभागाच्या कामकाजाची कल्पना येईल.
- समुपदेशकांकडून प्रसार माध्यमांना माहिती दिली जाऊ नये. रुग्णालय प्रमुखांकडून दिलेली माहिती हि सर्वसाधारण निरीक्षणांच्या स्वरुपातीलच असावी. केंद्राकडून मिळणाऱ्या सुविधांच्या बाबतीत माहिती व केंद्राच्या काही खाजगी बाबी, जसे आकडेवारी, प्रकरणांचे तपशील यात तफावत आहे. समुपदेशिकेने ते जाणून माहिती द्यावी की गोपनीयतेच्या तत्वांतर्गत नाकारावी हे ठरवावे.
- समुपदेशकांनी समुपदेशनार्थींना वैयक्तिक दूरध्वनी क्रमांक देऊ नयेत.
- महिलेवर हिंसा करणाऱ्या नातलगांनी जर समुपदेशिकेस धमकी देण्याचा प्रयत्न केला तर रुग्णालयाच्या आवारात असणाऱ्या सुरक्षा रक्षकांना पाचारण करणे महत्त्वाचे ठरते.

**हिंसाग्रस्त व्यक्तीने करावयाच्या तातडीच्या व व्यवहार्य बाबी**

१. स्त्रीने अपघात विभाग असलेल्या जवळच्या दवाखान्यात जाऊन आपल्यावर झालेल्या अत्याचाराची माहिती द्यावी. तपासणी करुन डॉक्टरी सल्ला घ्यावा. पुढे अत्याचाराविषयी पुरावा म्हणून मेडिको लीगल केसचा अहवाल महत्त्वाचा ठरु शकतो.

२. अत्याचाराच्या प्रसंगाबद्दल जवळच्या पोलिस ठाण्यामध्ये जाऊन अदखलपात्र गुन्हा (एन.सी.) किंवा हिंसाचाराचे प्रमाण जास्त असेल व त्या व्यक्तीला अटक व्हावी असे वाटत असेल तर प्राथमिक माहिती अहवाल (एफ.आय.आर.) म्हणून अत्याचाराची नोंद करावी व तक्रार क्रमांक जपून ठेवावा.

३. कोर्टामध्ये केस करावयाची असल्यास समुपदेशकाच्या मदतीने वकिलांकडून कायदेशीर समुपदेशन उपलब्ध करुन दिले जाऊ शकते.


४. प्रत्येक स्त्रीने महत्त्वाची कागदपत्रे व पुरावे आपल्या जवळ सांभाळून ठेवणे आवश्यक आहे जसे लग्नाचे प्रमाणपत्र व फोटो, मुले असल्यास त्यांचे जन्मदाखले, घराची, जागेची, मालमत्तेची कागदपत्रे, फोटोपास, रेशन कार्ड, रुग्णालयातील केस पेपर, रिपोर्ट, अगोदर केस केलेली असल्यास त्याचा क्रमांक, शैक्षणिक प्रमाणपत्रे, बँकेत खाते असल्यास खाते पुस्तिका

५. समुपदेशन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडे मदतीकरिता जाणे व त्यांचे पत्ते, फोन यांची नोंद ठेवणे.

## लैंगिक हिंसा : काही सत्यता व आकडेवारी

सेहत ही संस्था मुंबईतील रुग्णालयांमध्ये लैंगिक/कौटुंबिक हिंसाग्रस्त व्यक्तींना सहाय्य करण्याचे काम करीत असून आपल्या कामाचा एक भाग म्हणून मुंबईतील तीन उपनगरीय रुग्णालयांमधील लैंगिक हिंसा पिडीत व्यक्तींसोबतच्या कामाचा आढावा घेतला. [१]माहितीचा स्त्रोत : वैद्यकीय-कायदेशीर प्रकरणांचे विश्लेषण - सेहत. त्यातून पुढे आलेल्या माहितीची खालील प्रमाणे मांडणी केली असून त्यावरुन लैंगिक हिंसेविषयक अनेक मिथके दूर होण्यास मदत होऊ शकते.

### १. वयोगट आणि अत्याचाराचे प्रकार




वरील तक्त्यातून हे लक्षात येईल की शिस्नाचा योनीमध्ये प्रवेश न होता देखील लैंगिक छळ/अत्याचार केला जाऊ शकतो. तसेच लैंगिक अत्याचार केवळ तरुण स्त्रियांवर होतो असे नसून ० ते १२ वर्षाच्या मुलींवर देखील योनि प्रवेशासह किंवा त्याशिवायही मोठ्या प्रमाणात अत्याचार झालेले आढळतात.


---

माहितीचा स्त्रोत : वैद्यकीय-कायदेशीर प्रकरणांचे विश्लेषण - सेहत

१. न्याय-वैद्यकीय रिपोर्ट्स / लैंगिक हिंसेची नोंद करण्यासाठी तीन सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आलेल्या पिडिता


२. कालावधी : एप्रिल २००८ ते मार्च २०१५ - संख्या : ७२८

## २. हिंसा करणाऱ्या व्यक्तीशी नाते व पिडीत व्यक्तीचा वयोगट





हिंसा करणाऱ्या व्यक्ती या कुटुंबातील किंवा परिचयातील असतात. अनोळखी व्यक्तींकडून होणाऱ्या हिंसेचे प्रमाण कमी असते. सिनेमामध्ये दाखविल्या प्रमाणे एकट्या दुकट्या स्त्रीवर अनोळखी व्यक्तीने निर्जनस्थळी झडप घालून केलेले अत्याचार प्रत्यक्षात कमी प्रमाणात आढळतात. वरील तक्त्यात हे स्पष्ट दिसून येते की सर्व वयोगटातील स्त्रियांवर परिचितांकडून झालेल्या लैंगिक अत्याचाराचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**३. अत्याचाराचे ठिकाण :** घर ही सुरक्षित जागा समजली जाते परंतु तक्त्यावरुन असे दिसून येते की, सगळ्यात जास्त लैंगिक हिंसा हि पिडीत व्यक्ती किंवा हिंसा करणाऱ्या व्यक्तीचे घर किंवा घराजवळील जागा येथे झालेली आहे.



**४. अत्याचाराचा प्रकार :** अंतरप्रवेश असलेला व नसलेल्या अत्याचाराचे प्रमाण जवळ जवळ निम्मे आहे. पण अंतरप्रवेश नाही म्हणजे लैंगिक हिंसा झालेली नाही असे म्हणता येणार नाही. अंतरप्रवेश नसलेला अत्याचारही तितकाच गंभीर परिणाम करु शकतो.




वरील अभ्यासक्रमावरुन असा निष्कर्ष निघू शकतो की स्त्रीवर बलात्कार/ लैंगिक अत्याचार होणे हे तिच्या वयावर, दिसण्यावर, कपड्यांवर किंवा वर्तनावर अवलंबून नसते. लैंगिक अत्याचाराचे मूळ हे पुरुषप्रधान संस्कृती व पुरुषी वर्चस्व मान्य केलेल्या समाज व्यवस्थेमध्ये आहे. स्त्रीवरील पुरुषी सत्तेच्या अभिव्यक्तीचे ते एक अत्यंत अतिरेकी व बीभत्स स्वरुप आहे. समाजाने मान्यता दिलेल्या पौरुषत्वाच्या व योनिशुचीतेच्या विकृत संकल्पनांचा तो विपरीत परिणाम आहे.

## दिलासा विभाग असलेली मुंबईतील रुग्णालये

**के. बी. भाभा हॉस्पिटल**
ओपीडी 101, गायनेक ओपीडी, आर.के. पाटकर मार्ग,
बांद्रा (पश्चिम), मुंबई-400 050.
☎ डायरेक्ट : 022-26400229
हॉस्पिटल - 26422541/26422775, विस्तार 4376

**के. बी. भाभा हॉस्पिटल**
ओपीडी 15, बेलग्रामी रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई-400 070.
☎ : 022-26500241 / 26500144

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनरल हॉस्पिटल**
(शताब्दी हॉस्पिटल), ग्राऊंड फ्लोअर, ए-विंग, ओपीडी 7, पारेखनगर,
एस. व्ही. रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई-400 067.
☎ डायरेक्ट : 022-28647002
हॉस्पिटल - 022-28647003, विस्तार 1046

**एम. डब्ल्यु. देसाई हॉस्पिटल**
ओपीडी 2, हाजीबापू रोड, गोविंद नगर, मालाड (पूर्व), मुंबई-400 097.
☎ डायरेक्ट : 022-287741216
हॉस्पिटल - 022-28770000/28774215

**सिद्धार्थ म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल**
ओपीडी बिल्डींग, पहिला मजला, सोनोग्राफी विभागासमोर,
पोस्ट ऑफिस समोर, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-400 062.
☎ डायरेक्ट : 022-8782886
हॉस्पिटल - 022-28766885, विस्तार 267

**हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केयर म्युनिसिपल हॉस्पिटल**
पहिला मजला, गायनेक ओपीडी जवळ, पश्चिम द्रुतगति महामार्ग,
एस.आर.पी.एफ. कॅम्प समोर, बांद्रेकर वाडी, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-400 060.
☎ डायरेक्ट : 022-28224078
हॉस्पिटल - 022-28224081, विस्तार 211

**डॉ. आर. एन. कूपर म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल**
लोअर ग्राऊंड, गायनेक ओपीडी, यु-15, भक्ती वेदांता स्वामी मार्ग,
गुलमोहर रोड, भागूबाई पॉलिटेक्निक कॉलेज समोर, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई-400 056.
☎ डायरेक्ट : 022-26210043 ☎ हॉस्पिटल - 022-26205892, विस्तार 144

**वि. एन. देसाई हॉस्पिटल**
ओपीडी 33 अ, पहिला मजला, गायनेक ओपीडी जवळ,
टि.पी.एस., तिसरा रोड, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-400 055.
☎ : हॉस्पिटल - 022-26182083, विस्तार 340

**सेठ वि.सी. गांधी व म.ए. वोरा म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल**
(राजावाडी हॉस्पिटल), ओपीडी 22, 2रा मजला, 7 एम.जी. रोड,
सोमैया कॉलेज समोर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-400 077.
☎ डायरेक्ट : 022-21020144 ☎ हॉस्पिटल - 022-21025149, विस्तार 221

**क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले म्युनिसिपल हॉस्पिटल**
ओपीडी 12 ए, तळमजला, विकास कॉलेजसमोर, कन्नमवार नगर 2,
विक्रोळी (पूर्व), मुंबई-400 083.
☎ डायरेक्ट : 022-25770799 ☎ हॉस्पिटल - 022-25782283

**स्वातंत्र्यवीर वि. डी. सावरकर म्युनिसिपल हॉस्पिटल**
ओपीडी 22, पहिला मजला, गवाणपाडा, देशमुख गार्डनच्या मागे,
मुलुंड (पूर्व), मुंबई-400 081.
☎ डायरेक्ट : 022-25631125 ☎ हॉस्पिटल - 022-21636225

**एम. टी. अग्रवाल हॉस्पिटल**
ओपीडी 7, डॉ. आर.पी. रोड, इ.एस.आय.एस. हॉस्पिटल समोर,
बँक ऑफ इंडिया समोर, एल.बी.एस. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-400 067.
☎ डायरेक्ट : 022-25601888 ☎ हॉस्पिटल - 022-25605727

**शताब्दी हॉस्पिटल**
ओपीडी 15, मदन मोहन मालवीय, वामन तुकाराम पाटील रोड, डुक्स कंपनी समोर,
पाटील वाडी, गोवंडी (पूर्व), चेंबूर, मुंबई-400 088.
☎ डायरेक्ट : 022-25500038 ☎ हॉस्पिटल - 022-25564069 विस्तार 241

## महिलांवर होणाऱ्या हिंसेविरोधात काम करणाऱ्या संस्था

### मुंबई

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
पोलिस आयुक्त कार्यालय,
पोलिस मुख्यालय,
रुम नं.36, ए ब्लॉक, गेट नं.5,
क्रॉफर्ड मार्केट समोर, मुंबई-400 001.
फोन : 022-22620111
विस्तार क्र. 206
भेटण्याची वेळ : सोम, बुध, गुरु, शुक्र.
सकाळी 10 ते सायं. 6

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
सैतान चौकी पोलिस स्टेशन,
शारदाश्रम शाळेच्या जवळ,
दादर (पश्चिम), मुंबई-400 028.
भेटण्याची वेळ : सोम, बुध, गुरु, शुक्र.
सकाळी 10 ते सायं. 6

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
कन्नमवार नगर 2,
विक्रोळी पोलिस स्टेशन,
विक्रोळी (पूर्व), मुंबई-400 083.
फोन : 022-25786991
भेटण्याची वेळ : सोम, बुध, गुरु, शुक्र.
सकाळी 10 ते सायं. 6

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
सर्वेश्वर मार्ग, भाभा हॉस्पिटलच्या जवळ,
कुर्ला पोलिस स्टेशन, कुर्ला (पश्चिम),
मुंबई-400 070.
भेटण्याची वेळ : सोम, बुध, गुरु, शुक्र.
सकाळी 10 ते सायं. 6

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
सेक्टर 1,
सी.बी.डी. बेलापूर डेपोच्या समोर,
नवी मुंबई-400 614.
फोन : 022-27580225
भेटण्याची वेळ : सोम, बुध, गुरु, शुक्र.
सकाळी 10 ते सायं. 6

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
वाकोला पोलिस स्टेशन, आनंद नगर,
सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-400 055.
फोन : 022-26683257
भेटण्याची वेळ : सोम, बुध, गुरु, शुक्र.
सकाळी 10 ते सायं. 6

**महिला व मुलांकरिता सहाय्य कक्ष**
कांदिवली पोलिस स्टेशन,
स्वामी विवेकानंद रोड,
शताब्दी हॉस्पिटलच्या समोर,
कांदिवली (पश्चिम), मुंबई-400 067.
फोन : 022-24691753
भेटण्याची वेळ : सोम, बुध, गुरु, शुक्र.
सकाळी 10 ते सायं. 6

**स्नेहा (सोसायटी फॉर न्युट्रिशन एज्युकेशन अँड हेल्थ एक्शन)**
310, 3रा मजला, अर्बन हेल्थ सेंटर,
60 फिट रोड, छोटा सायन हॉस्पिटल,
धारावी, मुंबई-400 017.
फोन : 022-24042627 / 24040045 / 240400245 / 24086011

**सख्य-महिला मार्गदर्शन कक्ष**
ठाणे सिव्हिल हॉस्पिटल,
तळमजला, उत्साल रोड आणि
हेगडे रोड, पोलिस वसाहतच्या मागे,
शंकरराव पेडणेकर रोड,
टेंभी नाका ठाणे (पश्चिम),
ठाणे -400 601.

**आवाज ए निस्वान**
रेहनुमा लायब्ररी सेंटर,
दारुल-फलाह बिल्डींग, 1ला मजला,
सी विंग, रुम नं.102,
किस्मत सोसायटी समोर, कौसा, मुंब्रा,
ठाणे-400 612.
फोन : 022-25490038
Email: rehnumacentre@gmail.com

**स्त्री मुक्ती संघटना कौटुंबिक सल्ला व समुपदेशन केंद्र**
मातोश्री रमाबाई आंबेडकर
प्रसूतीगृहच्या आवारात,
जैन मंदिर जवळ,
रामकृष्ण चेंबुरकर रोड,
चेंबूर नाका, मुंबई-400 071.
फोन : 022-25297198/65745837
Email: smstcc.c@gmail.com

**स्त्री मुक्ती संघटना कौटुंबिक सल्ला व समुपदेशन केंद्र**
जुने सेतू कार्यालय, 1ला मजला,
एम.एस.ई.बी. ऑफिस जवळ,
सेक्टर 1, वाशी, नवी मुंबई-400 703.
फोन : 022-27821564
Email: smsfcc.v@gmail.com

**आसरा**
104, सनराईज आर्केड,
प्लॉट नं.100, सेक्टर 16,
कोपरखैरणे, नवी मुंबई-400 709.
फोन : 022-27546669

**स्वाधार केशव गोरे स्मारक ट्रस्ट**
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, आरे रोड,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई-400 062.
फोन : 022-28720638
Email: swadhargoregaon@gmail.com

**मैत्र हेल्पलाईन**
श्री गणेश दर्शन, 9वा मजला,
आय.पी.एच. एल.बी.एस. मार्ग,
महाराष्ट्र प्लायवूड सेंटरच्या समोर,
हरी निवास सर्कल, नौपाडा,
ठाणे (पश्चिम) - 400 602.
फोन : 022-25385447
Email: iph@healthymind.org

**सख्य-महिला मार्गदर्शन कक्ष**
सिल्वर स्मृती, 1ला माळा,
कळंब रोड, पोलिस चौकीच्या मागे,
निर्मल नालासोपारा (पश्चिम),
तालुका-वसई, जिल्हा-पालघर-410 304.
मो. : 09890312402
Email: sakhya_87@rediffmail.com

**आवाज ए निस्वान**
47/1, सर बाई हसन अली रुपवाला,
मोरेश्वर पाटणकर महापालिका शाळा,
एस.ए. मेडीकल, किंग बेकरीच्या बाजूला,
पाईप रोड, कुर्ला (पश्चिम),
मुंबई-400 070.
फोन : 022-26523402
मो. : 9833534933
Email: niswan@gmail.com

## दिल्ली

**जागोरी**
बि-114, शिवालिक,
मालवीय नगर,
नवी दिल्ली-110 017.
फोन : 011-26691219/26691220

**तार्शी**
सी. 29, तळघर, कैलाश (पूर्व),
नवी दिल्ली-110 065.
फोन : 011-26324023/24/25
Email: tarshi@vsnl.com
Website: http://www.tarshi.net

**राही फाऊंडेशन**
आई - 1804, दुसरा माळा,
चित्तरंजन पार्क,
नवी दिल्ली - 110 019.
फोन : 011-41607055

**एक्शन इंडिया**
5/27 ए, जंगपुरा,
राजदूत हॉटेलच्या मागे,
नवी दिल्ली - 110 014
फोन : 011-24377470/24374785

**शक्ती शालिनी**
6/30 बि., लोअर ग्राऊंड फ्लोर,
कारगिल पार्क लेन जवळ,
जंगपुरा, नवी दिल्ली-110 014.
फोन : 011-24372437/24373737
मो.: 09899522889/9711053706

## वडोदरा

**ओळख - (अ स्पेस फॉर विमेन अ फेमिनिस्ट डॉक्यूमेंटेशन रिसोर्स एंड कौन्सेलिंग सेंटर)**
8-अ, निवृत्ती कॉलनी,
जिला तालीम भवनच्या समोर,
विरोक हॉस्पिटल आणि
उपेन्द्रचार्या आश्रम दोहोंच्या मध्ये,
आर्य कन्या विद्यालय रोड,
करेली बाग, वडोदरा-390018.
फोन : 0265-2486487/2466037

## पुणे

**आशा संस्था**
रु.नं. 4/5, मोनाशा अपार्टमेंट,
सर्वे नं.1070, महालक्ष्मी मार्केट समोर,
शनिवार चौक, पुणे-411 002.
फोन : 9421016006

**नारी समता मंच**
463, टिळक रोडच्या समोरची गल्ली,
न्यू इंग्लिश शाळेच्या जवळ,
पुणे-411 030.
फोन : 020-24494652
मो.: 9766103458

**स्वाधार समुपदेशन केंद्र**
1170/20 बि., खर्शीकर बंगला,
किणीकर चौकच्या बाजूला,
रेवेनु कॉलनी, शिवाजी नगर,
पुणे-411 005.
फोन : 020-25511064
Email: contact@swadharpune.org, swadhar@rediffmail.com
Website: http://www.swadharpune.org/index.php

**माहेर**
वाडू बद्रुक, भीमा कोरेगाव,
तालुका-शिरुर, पुणे-412 216.
मो.: 9011086134 / 31

**मासूम संचालित संवाद-कुटुंब समुपदेशन केंद्र**
म्हाळसाकांत सोसायटी, सासवड,
तालुका-पुरंदर, जिल्हा-पुणे.
फोन : 02115-222969/202016

**चैतन्या महिला मंडळ**
13, नागेश्वर नगर, देहू फाटा,
पुणे-नाशिक रोड, पुणे मोशी,
माहुली वेडवाये शेजारी,
पुणे-421005
मो.: 8411004180

**श्रमिक महिला मोर्चा**
101, शिवाजी नगर,
मंगला सिनेमा गृहाजवळ, पुणे-411 005.
फोन : 020-23352053
मो.: 09422530186

## गुजरात / कच्छ

**कच्छ महिला विकास संघटना**
उजस / अबदासा
16 - योगेश्वर, घनश्याम नगर,
जिम खानाच्या जवळ,
भुज कच्छ-370 001. गुजरात.
फोन : 02832-222124/223311/
255125
Email: kmvskutch@gmail.com

**उजस/अबदासा महिला विकास संघटना**
36, बँकर्स कॉलनी, गेट नं.1, आयीया
अपार्टमेंट, भूज, गुजरात-370 001.
फोन : 2832-223311/222124

**सेंटर फॉर सोशल जस्टीस**
सि-106, रॉयल चिन्मय,
आय.ओ.सि. पंपच्या समोर,
जज्जेस बुनालो रोड, बोडाकदेव,
अहमदाबाद, गुजरात-380 054.
फोन : 079-26854248
Email: socialjust@gmail.com
Website: http://www.centreforsocial
justice.net

## जयपूर

**विशाखा महिला शिक्षण एवं शोध समिती**
रु.नं.106, नमन रेसिडेन्सी,
कृष्ण विहार, जयपूर - 302 020.
राजस्थान.
फोन : 0141-2395986
Email: khanshabz@gmail.com
Website: http://www.vishakhawe.org

## बंगलोर

**विमोचना**
नं.33/1-10, 4 क्रॉस,
त्यागराज लेआऊट, जय भारत नगर,
बंगलोर-560 033.
फोन : 080-25492783/
25492781/25494266/
25492782
Email: vimochana79@gmail.com
Website: http://www.vimochana.in

**हेन्गासारा हक्कीना संघ**
1024, 4 टी ब्लॉक, 38वा क्रॉस,
25वा मेन, जय नगर,
बंगलोर-560 041.
फोन : 080-26639884/65701981
Email: hhs@bgl.vsnl.net.in

## कोलकाता

**स्वयंम**
9/2 बी, देओदार रोड,
कोलकाता-700 019.
फोन : 033-24863367/3368/3357
Email: swayam@cal.vsnl.net.in

## मध्य प्रदेश

**संगिनी-जेंडर रिसोर्स सेंटर**
ए/4, जय भवानी फेज 2,
रोहित नगर, भोपाल-462 039.
फोन : 0755-2420361
Email: info@sangini.org.in

**जन साहस**
14, मिल रोड,
पोस्ट बालघर,
देवास, मध्य प्रदेश-455 001.
फोन : 7272-254490/408090
Email: jansahas@gmail.com

## उत्तर प्रदेश

**हमसफर (सपोर्ट सेंटर फॉर वीमेन)**
सि-80, रु.नं.2, सेक्टर ए,
महानगर (छान्निलाल चौक),
लखनऊ, उत्तर प्रदेश-226 006.
फोन : 0522-2205215/4062119
Email: humsafar25mov@gmail.com

**अली (एसोसिएशन फॉर एडवोकेसी अँड लीगल इनिशिएटिव)**
407, डॉ. वैजनाथ रोड,
नु. हैदराबाद कॉलनी,
नु. हैदराबाद पोस्ट ऑफिसच्या जवळ,
लखनऊ, उत्तर प्रदेश-226 007.
फोन : 522-2782060
Email: aali@aalilegal.org
Website: http://www.aalilegal.org/

# संपर्क यादी

| नाव व पत्ता | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | कार्यालय | मोबाईल |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# संपर्क यादी

| नाव व पत्ता | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | कार्यालय | मोबाईल |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# संपर्क यादी

| नाव व पत्ता | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | कार्यालय | मोबाईल |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# संपर्क यादी

| नाव व पत्ता | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | कार्यालय | मोबाईल |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# संपर्क यादी

| नाव व पत्ता | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | कार्यालय | मोबाईल |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# दिलासा

मुंबई महानगरपालिकेने 'सेहत' या आरोग्य सेवेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेच्या सहाय्याने के.बी. भाभा रुग्णालय, वांद्रे येथे २००० साली 'दिलासा' विभाग (OPD) सुरु करण्यात आला. दिलासा हे भारतातील प्रथम रुग्णालय स्थित आपत्कालीन सहाय्यता केंद्र असून महिला व मुलांवर होणाऱ्या हिंसे विरोधात काम करते. हिंसेमुळे अनेक शारीरिक व मानसिक समस्या उद्‌भवतात. त्या समस्यांच्या उपचाराकरता स्त्रिया रुग्णालयात येतात व प्रथम आरोग्य सेवकांच्या संपर्कात येतात. यामुळे हिंसा होत असल्यास ती लवकर ओळखता येऊ शकते व योग्य ती मदत हिंसा पिडीत व्यक्तीला मिळू शकते. महिलांच्या घराबाहेर पडण्यावर बंधन असले तरी, आरोग्याच्या तक्रारी करता किंवा मुलांना दवाखान्यात नेण्यापासून सहसा रोखले जात नाही ज्यामुळे तिला मदती करता रुग्णालयापर्यंत पोहोचणे सहज शक्य होते. दिलासा महिलांचा जास्त वावर असलेल्या बाह्यरुग्ण विभागात असल्याने महिलांना सहज तेथे जाता येते. रुग्णालयात दिलासा सुरु करण्यामागे हाच उद्देश होता. समाजामध्ये प्रत्येकाला हिंसामुक्त जीवन जगण्याचा अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर अत्याचार करण्याचा अधिकार नाही हेच दिलासाचे ब्रीद वाक्य आहे. या केंद्रात हिंसापिडीत महिलांशी बोलायला, कठीण परिस्थितीतून मार्ग काढायला अनुभवी समुपदेशकांची नियुक्ती केलेली आहे. दिलासामध्ये खालील सेवा दिल्या जातात.

- समुपदेशन-हिंसेविषयी बोलण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध करुन देणे
- पिडीत व्यक्तीला तिच्या हक्कांविषयी माहिती देणे
- न्याय वैद्यक तक्रार व पोलिसात तक्रार करण्याकरता सहाय्य
- कायदेशीर समुपदेशन
- रुग्णालयात तातडीच्या निवाऱ्याची सोय
- पुढील मदतीकरता संबंधित संस्थांना जोडून देणे

आज पर्यंत ४००० हून अधिक व्यक्तींनी दिलासाच्या या सुविधांचा लाभ घेतला आहे.

# सेहत

‘सेहत’ हे (सेंटर फॉन इनक्वायरी इनटू हेल्थ अँड अलाईड थीम्स) अनुसंधान ट्रस्टचे संशोधन केंद्र आहे. आरोग्य विषयक लोकाभिमुख संशोधन व सामाजिक कार्य करण्यासाठी १९९१ साली ‘सेहत’ची स्थापना झाली. आरोग्य व आरोग्य सेवा हा जनतेचा हक्क आहे हा समज समाजात घट्ट व्हावा या दिशेने सेहतचे संशोधन व इतर सामाजिक कार्य चालते. ‘सेहत’ने १९९४ पासून सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या चार पैलूंवर पंचेचाळीस पेक्षा जास्त प्रकल्प हाती घेतले आहेत. जसे आरोग्य-सेवा व त्याचे अर्थकारण, आरोग्यविषयक कायदे व नैतिकता, रुग्णांचे हक्क, स्त्रियांचे खास आरोग्य प्रश्न, हिंसा व आरोग्य.